xxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxx

## प्रकरण पहिले

## " सदानंद देशमुख पूर्व मराठी ग्रामीण कादंबरी "

xxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxx

सदानंद देशमुख यांच्या " तहान " या कादंबरीचा अभ्यास हा प्रस्तुत प्रबंधिकेचा विषय आहे.

" ग्रामीण साहित्य " असा शब्दप्रयोग मराठी साहित्यात अलिकडच्या कालावधित रूढ झाला. ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य अशा प्रकारची वर्गीकरण पध्दत अभ्यासकांनी अभ्यासाच्या सोयीसाठी स्वीकारलेली दिसते या वर्गीकरणाची तरफदारी करणारे लेखनही मराठीत विपुल झालेले आहे. सदानंद देशमुख यांच्या " तहान " कादंबरीचा समग्र अभ्यास करीत असताना ग्रामीण साहित्याची संकल्पना, ग्रामीण साहित्य प्रवाहातील कादंबरी वाङ्.मय प्रकाराचे स्वरूप आजवर प्रसिध्द झालेल्या ग्रामीण कादंब-याचा आढावा या प्रकरणात घेण्याचे योजिले आहे.

ग्रामीण साहित्याचा विचार करताना प्रथम ग्रामीण साहित्य म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे काय ? या विषयी आनंद यादव म्हणतात - " खेडेगाव तेथील जीवन पध्दती, तेथील रीती, शेती, निसर्गाशी मातीशी असलेले मानवी व प्रादेशिक वैशिष्टयपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न, समस्या इ. सर्व अनुभूतीतून निर्माण झालेले साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय. "[१अ]

, तर ग्रामीण साहित्याविषयी गो. मा. पवार म्हणतात " ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण जीवनाचे, ग्रामीण मनाचे चित्रण करणारे साहित्य होय "[१ब]

" ग्रामीण साहित्य " ही एक वर्णनपर संज्ञा आहे. ती मूल्यदर्शक किंवा मूल्यवाचक नाही. काव्य, कादंबरी या शब्दांना जसा मूल्यवाचक अर्थ आहे तसा " ग्रामीण " या शब्दाला नाही जरी ग्रामीण साहित्याची प्रेरणा अन्य साहित्यापेक्षा भिन्न असल्या तरी त्यांच्या मूल्यमापनाचे निकष वेगळे असावेत असे कुणीही म्हणणार नाही. गो. मा. पवार यांनी नेमकेपणाने असे म्हटले आहे की, " माझ्या मते ग्रामीण साहित्य ही सोयीसाठी वापरावयाची वर्णनपर संज्ञा आहे. ती मूल्यवाचक संज्ञा नाही " ऐतिहासिक कादंबरी" सामाजिक नाटक या शब्दप्रयोगातून ऐतिहासिक, सामाजिक ही विशेषणे केवळ वर्ण्यविषयाचा निर्देश करतात. त्याप्रमाणे ग्रामीण हे विशेषण विशिष्ट लेखनात कशाचे चित्रण आहे, याचा फक्त निर्देश करते.[१८] असे सांगितले आहे. आनंद यादवांनीही याचा निर्देश करताना म्हटले आहे की, " भारतीय जीवनात व संस्कृतीत ग्रामीण साहित्याला असाधारण महत्व आहे. इथल्या मातीचे दर्शन घडविणारे ते खास साहित्य आहे "[२] ग्रामीण मनाचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडणे अपरिहार्यच आहे.

प्रेरणा भिन्नत्वामुळे दलित साहित्य व ग्रामीण साहित्य यात फरक आहे. दलित साहित्यामध्ये प्रक्षोभ, विद्रोह, बंड आहे. सवर्णांच्या विरुध्द लढा देण्याची प्रेरणा आहे. समाजाच्या प्रस्थापित चौकटीच्या मोडतोडीची भावना त्यात आहे. तीव्र असंतोष, सुडाची भावना आहे. त्यांचा हा विद्रोह नव्या समाजासाठी, नव्या समाजरचने-साठी आहे. त्यामुळेही त्याला मर्यादाही पडतात. ज्या कथा, कादंबऱ्यात प्रक्षोभ आणि विद्रोह नसेल त्या दलित लेखकांनी लिहिल्या असल्या तरी एकदम त्या नाकारल्या जातात, अन्यथा त्यात ओढून ताणून आणला जातो. या कारणांमुळे दलित साहित्यामध्ये एकसुरीपणा येत

असल्याचे जाणवू लागले आहे.

इतर लेखकांची जी जीवनदर्शनाची प्रेरणा असते ( नागरी/शहरी लेखकांची ) तीच ग्रामीण साहित्यिकांची असते. ग्रामीण साहित्यामध्ये अनुभवाच्या दृष्टीने संपन्नता आहे. वेगवेगळ्या जाती, ताणतणाव नियती आणि माणूस यांचा संघर्ष यांचे चित्रण येते. ग्रामीण साहित्यिकांनी कोणतीही जीवनविषयक जाणीव नाकारलेली नाही. "कृषिप्रधानता शेतीचा उपयोग हा खेडयांचा आत्मा आहे हा आत्मा जोवर होत नाही तोवर भारतीय खेडे कितीही सुधारले तरी खेडेच राहणार हे उघड आहे. त्यामुळे भारतीय जीवनात व संस्कृतीत ग्रामीण साहित्याला असन्यसाधारण महत्व आहे."[3] हे पटते.

ग्रामीण साहित्याच्या अस्सलपणाचा प्रत्यय " ग्रामीण संवेदनशीलते" च्या अंगानेच पडताळून पहाता येईल याच आधारावर आपण लेखकाचे अनुभव घेणे व प्रकट करणे हे खरोखरीच सामर्थ्यवान आहे की नाही हे ठरवू शकू. अनुभव घेण्याची व प्रकटीकरणाची वैशिष्ट्यपूर्ण रीत म्हणजे संवेदनशीलता होय या वातावरणात लेखक वाढतो त्याचे काही संस्कार त्याच्यावर होतात त्याची लेखक म्हणून जडण-घडण या संस्कारावरच होत असते. हे संस्कार जितके अस्सल तितका तो लेखक सामर्थ्यवान ठरत असतो.

संवेदनशीलतेचा विचार करताना त्यात ग्रामीण व नागर असा भेद करता येईल का ? याचे उत्तर होय असे द्यावे लागेल कारण खेडयातील जीवनरहाटी आणि शहरातील जगण्याची पध्दती यांच्यामध्ये मूलभूत फरक आहे. त्यामुळे व्यक्तिमत्वावर होणा-या संस्कारामध्येही हा फरक पडत जातो. खेडे हे सामूहिकरित्या जगणारे असते. गाव म्हणजेच एक मोठे कुटुंब असते. गावातला प्रत्येक माणूस दुस-याला ओळखत असतो त्यामुळे प्रत्येक व्यवहार हा गावाच्या साक्षीनेच होतो. या उलट शहरातील

परिस्थिती असते. एकतर तिथे अनेक वर्ग कल्पिलेले असतात. शहरी सभ्यपणाचे संकेतही वेगळे असतात. कुणालाच कुणाशी मन:पूर्वक लागाबांधा जोडायचा नसतो, त्यामुळे शहरांत माणसांची गर्दी असूनही माणूस तसा एकटाच असतो. खेड्यातल्यासारखी नात्यागोत्याची गुतवळ शहरात तयार होऊ दिली जात नाही, त्यामुळे एक प्रकारचे तुटलेपण माणसांना प्राप्त होते. ती एकाकी होतात, ही व्यक्ति-केंद्रितता खेड्यात नसते, म्हणून ग्रामीण भागात वाढलेला लेखक सामाजिक स्वरूपानेच घटनेकडे पाहतो. खेड्यातील सामूहिक जीवनाविषयी गो.मा. पवार यांनी केलेले विवेचन अधिक अर्थपूर्ण वाटते. " समाजातील सगळेजण एकमेकांशी बांधले आहेत. आपण या समाजाचा एक घटक आहोत अशी जाणीव निर्माण होते अशी जाणीव या व्यक्तीच्या ठायी निर्माण झाली म्हणजे ती जीवनाचा अनुभव स्वयंकेंद्रितपणे न घेता समाजशीलवृत्तीने, मानवाच्या व्यापक भूमिकेवरून घ्यायला लागतो या प्रकारे अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी म्हणजे ग्रामीण संवेदनशीलता होय. अशाप्रकारे अनुभव घेणाऱ्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला आहे असे म्हणता येईल."[४]

ग्रामीण साहित्याचे पुरस्कर्ते साहित्यिक आणि समीक्षक आनंद यादव म्हणतात, " ग्रामीण हा शब्द त्या प्रदेशातील शहरी वाङ्मयाला आपोआप व्याघात म्हणून " प्रादेशिक वाङ्मय " असे न म्हणता या सर्वांना मिळून ग्रामीण वाङ्मय असाच शब्द प्रयोग करणे जास्त योग्य वाटते. पुढे ते म्हणतात " प्रादेशिक " हा शब्द वापरताना त्या त्या प्रदेशातील " ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे शेवटी प्रादेशिक कादंबरी ही ग्रामीण कादंबरीच मानावी लागते. यादवांच्या मतानुसार कोणतेही साहित्य विशिष्ट प्रदेशामध्ये घडत असते त्यामुळे प्रादेशिक साहित्याचे वेगळेपण जाणवत नाही म्हणून " प्रादेशिक साहित्य " हा शब्द टाळून ग्रामीण

साहित्य असा शब्द वापरावा आणि शेवटी प्रादेशिक साहित्यात ग्रामीण जीवनाचेंच चित्रण असते. या विधानाचीही ते पुष्टी आपल्या मताला देतात पण काही अभ्यासकांचे असे मत आहे की आनंद यादवांनी " प्रादेशिक साहित्याला " शिंगे मोडून असे ग्रामीण साहित्याला बसवू नये ग्रामीण साहित्यापेक्षा प्रादेशिक साहित्याची विस्तृत दृष्टी लक्षात घेऊन " प्रादेशिक साहित्य " असा एकच शब्दप्रयोग करावा. अंबादास माडगूळकर आणि सुधंकांत खांडेकरयांनीही " ग्रामीण मराठी कथा " या आपल्या ग्रंथात आनंद यादव यांच्या मताशी पूरक मत मांडले आहे ते म्हणतात, " प्रादेशिकता म्हटली की ती ग्रामीण वाङ्मयाला अपरिहार्यपणे जवळ येते. कारण प्रादेशिक म्हणून जी चित्रणे आजवर मराठीत आली आहेत ती ग्रामविषयक चित्रणे आहेत म्हणूनच सर्व प्रादेशिक वाङ्मयाला ग्रामीण या सदराखाली घेतले तरी त्यात फारशी चूक होणार नाही. " तर ना. सी. फडके यांना " प्रादेशिक कादंबरी " अशी स्वतंत्र -" त-हा " मानण्याचे कारण नाही असे वाटते म्हणजे त्यांना " प्रादेशिक साहित्य " असा मवतासुध्दा मान्य नाही ते म्हणतात. " प्रादेशिक कादंबरी अशी कादंबरीची स्वतंत्र त-हा मानण्याचे वास्तविक कारण नाही. ग्रामीण साहित्याचीच ती एक शाखा आहे. शहरी जीवनाहून खेड्यापाड्यातील लोकांचे जीवन वेगळे आहे, ही जी ग्रामीण कथेमागची भूमिका तिच्यात बैठकीवरून प्रादेशिक कादंबरी लिहिली जाऊ लागली." ना. सी. फडके यांना ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्यामागील प्रेरणा एकच आहे. हे मान्य केले तरी तेवढ्यावर भेद-भेदाचा निकाल लावता येत नाही कारण " प्रेरणा साम्य " असणे हा एक भाग झाला. याशिवाय त्या साहित्याचे स्वरूपही तपासले जायला हवे या शिवाय फडके आणखी एका मुद्यावर जोर देतात तो म्हणजे " प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्याचीच एक शाखा आहे. यावर सुध्दा भेद-भेदाचा निकाल लावता

यावयाचा नाही कारण कोणताही साहित्यप्रकार शाखोपशाखा-मध्ये निबध्द असतो त्यांच्या स्वतंत्र रूपाचा विचार करणे आवश्यक असते.

ना. सी. फडक्यांना प्रादेशिक साहित्याचे स्वतंत्र स्थान मान्य नाही हे पाहिले पण त्या पुढेही जाऊन त्यांना एक उपप्रवाह किंवा शाखा म्हणून त्याचे नाविन्यही त्यांना मान्य नाही ते म्हणतात " ग्रामीण कथा " या नावाचं औचित्य मी समजू शकतो. आणि मान्य करतो परंतु प्रादेशिक कादंबरी असे नाव कादंबरीचा एक स्वतंत्र प्रकार म्हणून वापरलं जाव यात विचारांचा भोंगळपणा आहे असं मला वाटतं नाही कारण असं की, खरं पाहिले असता प्रत्येक कादंबरी प्रादेशिकच असते ..... तेव्हा " प्रादेशिक कादंबरी " वाटती तितकी नवीन मुळींच नाही. अलीकडच्या लेखकांनी हा एक नवाचं प्रवाह साहित्यात आणला हा दावा खरा नव्हे "[5] प्रादेशिक साहित्य असे वेगळे नाव मान्य करता येत नाही. हे फडक्याचे मत एक वेळ ग्राह्य धरता येते पण प्रादेशिक साहित्याच्या नाविन्याबद्दलची त्यांची शंका मात्र ग्राह्य धरता येणार नाही. कारण त्या हिशोबाने सर्व वाङ्मय-प्रकारांचे नावीन्य काय पण स्वातंत्र्यही अग्राह्य ठरवता येते.

मधु कुलकर्णींचे मत आनंद यादव यांच्या मताशी साम्य दाखविणारे आहे. ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यांच्यात किंचितसा फरक आहे बाकी संपूर्ण साम्य आहे, असे त्यांना वाटते ते म्हणतात, " ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यामध्ये काहींनी भेद मानलेला आढळतो. परिसर म्हणजे प्रदेश हे मान्य असल्यास ग्रामीण व प्रादेशिक या दोन्ही संज्ञा तशा समान-धर्मी आहेत हे मान्य होण्यास हरकत नाही. किंचितसा फरक मानायचाच झाला तर प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण संज्ञेपेक्षा व्यापक आहे. असे फार तर म्हणता येईल."[6] मधु कुलकर्णींनी आपल्याला जाणवलेले सत्य मांडले आहे.

त्यांच्या मते ग्रामीण-प्रादेशिक या दोन्ही संज्ञा तशा समानधर्मीय आहेत फरक मानायचा झाल्यास व्याप्ती-अव्याप्तीच्या आहे. कुलकर्णींनी कोणत्याही नावाचा हट्ट धरलेला नाही.

ना. श्री. फडकेंनी आपले कुतूहल बोलून दाखवताना म्हटले आहे, " का कुणास ठाऊक ग्रामीण हे विशेषण लघुकथेला लावलं जाऊ लागलं आणि " प्रादेशिक " या विशेषणानं मुख्यत्वेकरून कादंबरीचा उल्लेख होऊ लागला ".[७] फडक्यांना असे का वाटत असावे याचे कारण शोधायचे झाल्यास मधु कुलकर्णींच्या वरील विधानात सापडते म्हणजे प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण संज्ञेपेक्षा व्यापक आहे हेच त्या मागील कारण असावे.

पण नागनाथ कोत्तापल्ले यांना मात्र या दोन्ही संज्ञा स्वतंत्र आहे असे वाटते त्यांच्या मध्ये काही बाबतीत साम्य आहे हे त्यांना मान्य आहे. पण म्हणून त्या संज्ञा एकच आहेत असे मानने त्यांना मान्य नाही ते म्हणतात, " प्रादेशिकतेचे ग्रामीणत्वाशी निश्चित काहीबाबतीत साम्य असते, परंतु या दोन्ही संज्ञा एकच आहेत असे मात्र नाही. तसेच या दोन्ही संज्ञानी निर्देशित होणारा अर्थ ही सारखाचं असतो ते अर्थ परस्पर समांतर आहेत परंतु एक नव्हेत. कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला ग्रामसंस्कृतीला फारसे महत्व देत नाही तर ते महत्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला कधी ग्रामजीवन असे तर ते स्वतंत्र येत नाही. ते येते ते त्या प्रादेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून ".[८] म्हणजे ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्यात चित्रित होणारे घटक काही प्रमाणात सारखे असले तरी त्यांच्या आविष्कारात मात्र फरक असतो. ग. ना. जोगळेकर यांनी ग्रामीण व प्रादेशिक यात भेद केला आहे ते म्हणतात, " महाराष्ट्रासारखा मोठा भूप्रदेश अनेक उपप्रदेशामध्ये विभागला गेला आहे. त्यामुळेच कोकण, द. महाराष्ट्र मध्य महाराष्ट्र, खानदेश, माणदेश, बागलाण, विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्राचा पूर्व भाग किंवा गोंडवन असे भौगोलिक दृष्ट्या

पुष्कळ विभाग पडतात. या प्रत्येक प्रदेशातील समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, आचार-विचार आणि परंपरा वेगवेगळया आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये असलेल्या आदिवासींचे जीवन त्याहून वेगळे आहे, हे सर्व लक्षात न घेता प्रादेशिक जीवन असे सरसकट मांडणे विसंगत ठरते"[९]

## " तहान " पूर्व मराठी ग्रामीण कादंबरी :

### प्रास्ताविक :

बाबा पदमनजी यांची " यमुनापर्यटन " ही १८५७ साली कादंबरी लिहिली. मराठी वाङ्.मय क्षेत्रात पहिली कादंबरी म्हणून हीचा गौरव केला जातो तर इ. स. १९०३ मध्ये प्रकाशित झालेल्या " शिराजी पाटील" या रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांच्या कादंबरीच्या निमित्ताने मराठी ग्रामीण कादंबरीचा उगम मानला. १९०३ ते १९२० च्या दरम्यान मराठी कादंबरीने खूप चढ उतार पाहिल्याचे लक्षात येते. त्यात विशेषत: तिने उपेक्षाच सहन केली परंतु त्यातून तिने अस्तित्व टिकविले आणि त्या विकासात सदानंद देशमुख यांच्या " तहान " कादंबरीने वेगळे असे ग्रामीण जीवन वैशिष्टयेपूर्णरित्या चित्रित केले आहे.

" तहान " या ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करताना " तहान पूर्व ग्रामीण कादंबरीचा आढावा घेणे गरजेचे आहे. ग्रामीण कादंबरीच्या सुरुवातीपासून म. जोतिराव फुले, धनुर्धारी, कृष्णराव भालेकर, ना. वि. कुलकर्णी, साने गुरुजी, र. वा. दिघे, ग.ल. ठोकळ, विभावरी शिरुरकर, अण्णाभाऊ साठे, उध्दव शेळके, शंकर पाटील, हमीद दलवाई, जयवंत दळवी, रा. रं. बोराडे, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, विश्वास पाटील, राजन गवस या लेखकांच्या निवडक कलाकृतींच्या आधारे पहावयाचा आहे.

महात्मा जोतिराव फुले यांच्या " शेतक-यांचा आसूड " या पुस्तकाचा समावेश आपण कादंबरीच्या उद्गमाविषयीच्या परिच्छेदात करत आहोत. त्याची कारणे वेगळी आहेत. विश्वकोशामध्ये या पुस्तकासंबंधी माहिती सांगताना लिहिले आहे की, " श्रमिक बहुजन समाजाच्या आर्थिक अवनतीचे उत्कृष्ट चित्र " शेतक-यांचा आसूड " या विस्तृत निबंधामध्ये फुले यांनी रेखाटले आहे....या निबंधामध्ये भारतीय ग्रामोद्योग किंवा कुटिरोद्योग ब्रिटीश साम्राज्याखालीच्या आर्थिक धोरणाने कसे ढासळले आहेत याचे हृदयविदारक वर्णन केलेले आहे. [१०]

म्हणजेच या पुस्तकाचा उल्लेख विस्तृत निबंध म्हणून झालेला आहे. परंतु या निबंधाची भाषा काहीशी लालित्यपूर्ण असल्यामुळे या पुस्तकाचा विचार ग्रामीण कादंबरी उद्गमाच्या परिच्छेदात व्हावयास हरकत नाही.

समकालीन समाजवास्तवाशी इमान राखून लेखन करणा-या फुल्यांना कादंबरी लिहावयाची नव्हती परंतु त्यांच्या ठिकाणी असलेल्या जिव्हाळ्यामुळे आणि सूक्ष्म अवलोकनामुळे या लेखनात कादंबरीचे गुण उतरले आहेत. स.ग. मालशे " शेतक-याचा आसूड " संबंधी म्हणतात, - " " शेतक-यांच्या आसूड " या नाविन्यपूर्ण भाग म्हणजे शेतक-यांच्या अवनत स्थितीचे वास्तव चित्र, त्या अवनत स्थितीची केलेली सूक्ष्मग्राही चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यासाठी सुचविलेली उपाय योजना हा होय. शेतक-यांच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीनदीन गृहस्थितीचे जे यथार्थ वर्णन केले आहे ते एखाद्या ग्रामीण वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे "[११]
यानंतर कृष्णराव भालेकर यांच्या " बळीबा पाटील " या कादंबरीचा विचार करावा लागतो. बळीबा पाटील या कादंबरीचे मूळ शीर्षक बळीबा पाटील आणि १८७७ या दुष्काळ असे असून तिची निर्मिती खेड्यापाड्या-

मधील लोकांसाठी झालेली आहे. कादंबरी एकूण चार भागात विभागलेली आहे. पहिल्या भागात खेड्यातील जीवनाचे वर्णन आणि बळीबाच्या पाटीलकीचा इतिहास आला आहे. दुसऱ्या भागात त्याचा कुटुंबियाचा परिचय करून दिला आहे. तिसऱ्या भागात बळीबाने घेतलेल्या भाईबंदाच्या सभेचे वर्णन आहे. बळीबा व इतरांच्या भाषणातून आपण कोण व ईश्वराने आपणास का ? निर्माण केले आहे ? या विषयी संवादरूप विवेचन आले आहे. चौथ्या भागात बळीबाने जीवन सार्थकी लावण्यासंदर्भात काही उपदेशपर विवेचन केले आहे. म. फुल्यांच्या सत्यधर्माला अनुसरून केलेले हे विवेचन संवादरूप आहे.

कृष्णराव भालेराव यांनी लिहिलेली, " बळीबा पाटील " ही कादंबरी " दीनबंधू " मधून प्रसिध्द झाली. ही कादंबरी १८८८ मध्ये प्रसिध्द झाली असली तरी ती १८७७ मध्येच लिहिली गेली आहे असे सीताराम रायकरांचे प्रतिपादन आहे. रायकरांच्या या विधानानुसार " बळीबा पाटील " ही पहिली मराठी ग्रामीण कादंबरी ठरते पण " भालेकर समग्र वाङ्मय " ( प्रकाशक, महात्मा फुले समता प्रतिष्ठान) या ग्रंथाचे संपादक सीताराम रायकर पुढे म्हणतात, " भालेकरांनी आपल्या शेतकऱ्यांच्या स्थिती विषयीचे, त्यांची दुःखे दूर करण्यासाठी काय केले पाहिजे याविषयीचे विचार मांडण्यासाठी पात्रे, संवाद, प्रसंग व ग्रामीण पार्श्वभूमी वापरून प्रचाराची हेतू प्रधान मानून लिहिलेली ही कादंबरी आहे. कदाचित हे लेखन कादंबरी म्हणून झाले नसण्याची शक्यता आहे म्हणून सीताराम रायकर यांनी या मजकूराचा केवळ कादंबरी एवढा नाल्यामुळे " बळीबा पाटील " ही कादंबरी मानता येणार नाही असेही म्हटले आहे.[12] रायकरांच्या या विधानामुळे मराठीतील पहिल्या ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात भ्रम निर्माण होऊन ती जबाबदारी धनुर्धारी उर्फ रा. वि. टिकेकर यांनी १९०३ मध्ये प्रकाशित केलेल्या "विराजी पाटील" या कादंबरीवर येऊन पडते.

दुष्काळामुळे भणंग झालेल्या पिराजी पाटील आपल्या कुटुंबाची व इतर शेतक-यांची कशी वाताहत झाली याची कहाणी सांगते. तीच कहाणी लेखक आपल्या शब्दात पुन: कथित करतो. तत्कालिन ग्रामव्यवस्था, गावकामगारांचे एकमेकाशी असलेले संबंध शहरी पांढरपेशांची शेतक-याकडे पहाण्याची संकुचित व तुच्छतावादी वृत्ती सरकारी अधिका-यांची लाचखोरी, सरकारी आपल्यासाठी काहीच करत नाही या विषयांची शेतक-यांची चीड इत्यादी अनेकबाबी या कादंबरीत येऊन जातात. विविध विषयावर लेखणी चालवणा-या धनुर्धारी उर्फ रा. वि. टिकेकरांनी " वाईकर भटजी " या कादंबरीला जितकी लोकप्रियता मिळाली तितकी " पिराजी पाटील या कादंबरीची मात्र उपेक्षा झाली.

पिराजी गावचा पाटील आहे. आपण गावचे पालक आहोत. या भावनेने तो वागतो. गाव दुष्काळाच्या आगीत होरपळून निघतो तेंव्हा तो भुकेल्या लोकांच्या मुखात घालण्याचा प्रयत्न करतो परंतु त्याचे प्रयत्न अपुरे पडतात. दुष्काळ लांबतो. शेवटी लोक गांव सोडू लागतात. अन्नासाठी धर्मांतर करू लागतात. गावाची पार वाताहात होते.

ग्रामीण साहित्य चळवळींच्या अग्रस्थानी असणा-या डॉ. आनंद यादव यांनी आपल्या ग्रामीणता साहित्य आणि वास्तव या आपल्या ग्रंथात " पिराजी पाटील " या कादंबरीच्या संदर्भात " पहिली मराठी ग्रामीण कादंबरी " : पिराजी पाटील हा लेख समाविष्ट केला आहे. त्यामध्ये प्रस्तुत कादंबरीची त्या काळात उपेक्षा का झाली असावी या विषयीची शक्यता व्यक्त करताना ते म्हणतात, " ब्राम्हणवर्गाच्या व परंपरागत धर्माच्या विरोधात जाणा-या साहित्यावर ज्यावेळी कडाडून टीका होत असे...... शेतक-यांची पिळवणूक करणा-या नोकरदार वर्गात त्या काळीप्रामुख्याने ब्राह्मणच असल्याने व त्यांच्या स्वार्थी व क्षुद्र वृत्तीचे परखड दर्शन धनुर्धारींनी कादंबरीत घडविले असल्यामुळे कदाचित

तिच्याकडे तत्कालीन जाणकारांचे, वाचकांचे, समीक्षकांचे विद्यापीठात पुस्तके लावणाऱ्या विद्वानांचे दुर्लक्ष झाले असण्याची शक्यता आहे. तो काळ लक्षात घेता हे कारण नाकारता येणे कठीण जाते."[13]

ग्रामीण जीवन चित्रणाचा पुरस्कार करणारे म्हणून सुरवातीच्या कलाकृतीत उपरोक्त साहित्य ठळक मानता येते. " करमणूक " मधून १८९७ मध्ये हरिभाऊंनी " काळ तर मोठा कठीण आला " ही दीर्घकथा लिहली आहे. या कथेत त्यांनी रामजी धायगुडे या शेतकऱ्याच्या कुटूंबावर दुष्काळामुळे कोसळलेल्या आपत्तीचे व परिणामी झालेल्या विनाशाचे चित्र रेखाटले आहे. वी. सी. गुर्जर यांनी " दिपोटी " " अकार कोकणात " अशा काही कथा लिहिल्या आहेत. शि. म. परांजपे यांच्या " काळ " पत्रात प्रसिध्द झालेल्या " कडी फोडणारांची गोष्ट " या कथात्मक लेखात त्यांनी दुष्काळात होरपळून निघालेल्या ग्रामीण माणसाचे करुण चित्र रेखाटले आहे. तथापि ग्रामीण चित्रणाची दखल गांभिर्याने घेतली गेली नाही.

मराठी साहित्यातून ग्रामीण साहित्याचा वेगळा प्रवाह निघण्यामागील अनेक कारणापैकी " वैविध्य " हे एक कारण होते. त्यामुळे बहुतेक ग्रामीण कादंबऱ्या या मराठी कादंबरीच्या क्षेत्रात सुस्थापित झाल्यानंतर, लेखकांनी लिहिल्या असाव्यात असे वाटते.

ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात ना. वि. कुलकर्णींचे नाव घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. त्यांना वेगळ्या सृष्टीचे कादंबरीकार म्हणून संबोधले जाते. ना. वि. कुलकर्णी यांनी जीवनानुभवाच्या वेगळ्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रतिभेचा तो धर्मच आहे. उदाहरणार्थ - कामगार जीवनाचा वेध घेण्यासाठी " मजूर " ही कादंबरी लिहिली तर ग्रामजीवनाचा वेध घेण्यासाठी " ते दिवस जातील" ( १९२५ ) " शिपाई " ( १९२७), " मालिक " ( १९३१) या कादंबऱ्या लिहिल्या. शिवाय त्यांनी न्याय ( १९२६) संसारात

( कष्टी वडील १९३० ) या कादंब-या लिहिल्या.

ना. वि. कुलकर्णींचा ओढा ग्रामीण जीवन चित्रणाकडे होता. त्यामुळेच ते फडक्यांच्या लोकप्रियतेच्या धामधुमीत स्वत:चे वेगळेपण सिध्द करु शकले. फडक्यांच्या तंत्रयुगात फडके तंत्राला टाळून जे साहित्य निर्माण होई त्याची दखल घेतली जात नव्हती. वि. स. खांडेकरां-सारखे लेखकही या प्रभावातून सुटले नाहीत. अशा काळात ना. वि. कुलकर्णींनी वेगळया वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याबद्दल वि. स. खांडेकर म्हणतात, " जे धाडस कोल्हटकर, गडकरी, वा.म. जोशी, फडके यांनी केले नाही ते ना. वि. कुलकर्णी यांनी करुन " नवी दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला. आणि यामुळेच त्यांनी निर्माण केलेल्या नव्या वाटेवर आपणास दिघे, शिरुरकर, पेंडसे यांच्या सारखे अव्वल दर्जाचे साहित्य निर्मिती करणारे भेटू शकले हे विसरता येण्यासारखे नाही."[१४]

ग्रामीण साहित्याच्या या सुरुवातीच्या अडखळत्या वाटचालीतून एका नव्या वाड्मयप्रवाहाचा उगम झाला त्याचे नाव म्हणजे " प्रादेशिक साहित्य " वि. स. सुखटणकरांच्या " सहयाद्रीच्या पायथ्याशी ( १९३१ ) या कथासंग्रहाच्या या प्रवाहाचा उगम झाला. या प्रवाहाला स्वतंत्र मानायचे की नाही या बद्दल मतभेद आहेत. याच काळात वा.म. जोशी, वि. स. खांडेकर, मामा वरेरकर यासारखे शहरी लेखक ग्रामीण जीवनावर लेखन करण्याचा प्रयत्न करत होते.

वा.म. जोशी, खांडेकर, वरेरकर हे कादंबरीकार काही प्रमाणात ग्रामीण जीवन चित्रित करीत होते. खांडेकराच्या -कांचनमृग, " दोन ध्रुव, " उल्का " " क्रौंचवध " या कादंब-यामधून ग्रामीण जीवनाचे चित्रण आले आहे पण त्याचा या चित्रणाला सामाजिक आदर्शवाद आणि गांधीवादी तत्वज्ञान या त्यांच्या विचारसरणीच्या मर्यादा पडल्यामुळे केवळ पार्श्वभूमी म्हणून ग्रामीण वातावरण आलेले आहे. सहजिकच ग्रामीण जीवनातील ताणेबाणे त्यांना अधिक वार टहीने

टिपता आले नाहीत व तो त्यांचा हेतूही नव्हता. वा. म. जोशींच्या " इंदू काळे आणि सरला भोळे " या कादंबरीतील विनायकराव आपली प्राध्यापकी सोडून ग्रामसुधारणेसाठी गावी जातो तेथे काही प्रमाणात सुधारणा करतो एवढयापुरतेच हे चित्रण मर्यादित राहते.

वरेरकरांच्या कादंबऱ्यावरही " खेडयाकडे चला " या गांधींच्या भूमिकेचा प्रभाव असलेला दिसतो त्यांच्या " फाटकी वाकळ " " सी राम जोशी " " गोदू गोखले " या कादंबऱ्यातून मुलकताई खेडयातील शिक्षण प्रसार, श्रमदान इ. गोष्टी सुधारणेच्या दृष्टीने येतात.

खांडेकर, वरेरकर, वा.म. जोशी यांची ग्रामीण जीवनाविषयीची ओढ गांधींच्या तत्वज्ञानातून आलेली आहे. यामुळे त्यांच्या कादंबरीचे नायक सुधारणावादी वृत्तीने खेडयाकडे येतात. वरवरची सुधारणा करतात. त्यातच पुन्हा प्रेमाचे चित्रण येते. व हे नायक केवळ वैचारिक चर्चेपेक्षा दुसरे काही करु शकत नाहीत. यामुळे त्यांच्या कादंबऱ्या " खेडयाकडे चला " या प्रेरणेने भारलेल्या असल्यामुळे कृत्रिम आणि वास्तवशून्य स्वरुपाचे चित्रण करणाऱ्या ठरल्या आहेत.

साने गुरुजी हे मात्र गांधीजींच्या तत्वज्ञानाने प्रभावित होते तरी ते उथळ आणि वरवरचे ग्रामीण चित्रण करणारे लेखक नव्हते हे त्यांच्या " श्यामची आई " या पुस्तकातून स्पष्ट होते. खरे असूनही गुरुजींच्या लेखनास वाङ्मयीन प्रतिष्ठा लाभली नाही याचे कारण त्यांच्या साहित्याबद्दल समीक्षकात असणारा संभ्रम याबद्दल कुसुमावती देशपांडे आपल्या मराठी कादंबरी-पहिले शतक या ग्रंथात म्हणतात, " पां. स. साने यांची रचना विपुल आहे. त्यांची लहान मुलांसाठी " गोड गोष्टी " लिहिल्या मोठमोठया परकीय कादंबऱ्यांची सुटसुटीत व सुबोध रुपांतरे केली बरीच स्वतंत्र रचनाही केली. परंतु या रचनेपैकी किती भाग उपदेश प्रधान बालवाङ्मयात जमा धरावा व किती कादंबरी

प्रकारात समाविष्ट व्हावा हा प्रश्न उरतो.[१५] यांच्या "श्यामची आई " या पुस्तकाबद्दल रवीन्द्र ठाकूर लिहितात, " हे पुस्तक म्हणजे सुटया सुटया वाटणा-या परंतु एकमेकांशी गुंफलेल्या कथांची मिळून बनलेली एक कादंबरीच आहे. कोकणातील पालगड, वळवणी, लाडघर, दापोली, हर्णै ही गावे त्यांच्या आसपासचा ग्रामीण परिसर या कादंबरीतून साकार होतो. या कथेला कोकणी ग्रामजीवनाचे कोंदण लाभले आहे. त्या काळातल्या इतर कुठल्याही पुस्तकातून ग्रामजीवनाचे एवढे अस्सल दर्शन घडत नाही.[१६] ठाकूरानी " श्यामची आई " या पुस्तकास कादंबरीचे मूल्य दिले आहे शिवाय ही कादंबरी त्यांना उत्कृष्ट " ग्रामीण " कादंबरी वाटते.

साने गुरूजींच्या नंतर ग्रामीण साहित्य प्रवाहामध्ये र. वा. दिघे यांनी ठळक असे स्थान निर्माण केले तथापि साने गुरूजी-दिघे या मध्यावधीत ग. रा. वाळिंबे ( रामतनय ) यांनी " मोहित्याची मंजूळा" (१९३१ ) "खरा उद्धार " ( १९३६), " साखर गोटी " ( १९४४) " प्रमिलाबेन " ( १९४७) व गजाभाऊ या कादंब-या लिहिल्या तर वि. वा. हडप यांनी आपल्या काही कादंब-यातून ग्रामीण चित्रण केले. मा. श्या. पाटील यांनी " सीता " ( १९३१) ही कादंबरी लिहून ग्रामोध्दार कसा करता येईल याविषयी काही विचार मांडले. ना.ह. आपटे, दा. न. शिखरे या सर्वांनी ग्रामीण साहित्य इतिहासात दखल घ्यावी असे लेखन केले आहे. १९४० नंतर र. वा. दिघे यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण फडक्यांना मुजरा करून न करता स्वतंत्रपणे नव्या जाणिवेने केले. त्यांची ही जाणीव त्यांच्या उद्‌गारातून स्पष्ट होते. ते एके ठिकाणी म्हणतात - " मराठी वाङ्‌मयावर संस्कृत, इंग्रजी, बंगाली व फारशी वाङ्‌मयाची छाप पडली आहे. आपल्या नवीन वाङ्‌मयात बुलबुल गुलाबाच्या फुलाजवळ गातात, प्रणियांनाच्या अंगावर सिलोरी फुले उमलतात, किंवा मुखकमळे, प्रफुल्ल होतात. आम्हाला तसे काही दाखवायचे नाही. महाराष्ट्राचे खेरेखुरे देखावे, त्यातील ख-या

व्यक्ती आम्हाला तसे काही दाखवायचे नाही. महाराष्ट्राचे खरेखुरे दैन्य, त्यातील अस्सल व्यक्ती आम्हाला रेखाटावयाच्या आहेत. आमच्या खेडेगावातील प्रणय हा असा आहे हृदयात घुसला की हृदय फाडल्याशिवाय निघत नाही....[17] एवढ्या जाणिवेने त्यांनी कादंबरी लेखन केल्यामुळे आनंद यादव यांनी त्यांना " मराठी मातीचा पहिला कादंबरीकार असे संबोधले आहे. दिघेनी " पाणकळा", " सराई ", " आई आहे शेतात " " पड रे पाण्या ", " कार्तिक ", या महत्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या त्यांनी आपल्या कादंबऱ्यांसाठी " प्रादेशिक असा शब्द कुठेही वापरला नाही. पण तत्कालीन समीक्षकांनी त्यांना प्रादेशिक ठरविले. त्यांना प्रादेशिक कादंबरीकार म्हणून संबोधल्यावर वाईट वाटे. तथापि र. वा. दिघ्यांच्या निमित्ताने मराठी साहित्याला सापडलेली " ही नवी सोन्याची खाण " खरोखरच ग्रामीणता ओलांडून प्रादेशिकतेच्या टप्प्यात पाहोचली होती.

र. वा. दिघे यांच्या धीटपणामुळे पुढे ग.ल. ठोकळ यांच्यासारखा लेखक त्यांची प्रेरणा घेऊन लिहू लागला. ग.ल. ठोकळ यांच्या " गावगुंड " आणि दिघेंच्या " पाणकळा " या कादंबऱ्यात विलक्षण साम्य आढळते. या बद्दल कुसुमावती देशपांडे म्हणतात " व्यक्तिचित्राची निवड, ठेवून नायकांच्या चित्रणांची आवड, ग्रामजीवनाची ओढ व रानवट जीवनाच्या वर्णनातील झेप या गोष्टींत ठोकळ व दिघे यांच्यामध्ये बरेच साम्य आहे."[18]

" गावगुंड " चे वातावरण थोडे रांगडे थोडे पांढरपेशी आहे दिघ्यांच्या " पाणकळा ", व " सराई " चे दोष टाळून अत्यंत आटोपशीर आणि अटकर बांध्याची ही कादंबरी ठोकळांनी घडविली आहे. राजकीय अंदाधुंदीचा फायदा घेऊन काहींनी दरोडेखोरी सुरु केली. भूमिगतांच्या आणि दरोडेखोरांच्या कथा ऐकण्यात लोकांना रस वाटणे स्वाभाविक

होते. अशा काळात गावगुंडने गुणाजी आणि जयवंत या दोन भावांची रोमांचक कथा सादर केली.

याच काळात श्री. म. माटे आणि वामन चोरघडे यांची कथा घडू लागली होती तर श्री. रघुनाथ, बा. सी. मर्ढेकर, वि. द. घाटे, चिंदरकर, ना. के. महाजन, म.भा. भोसले यांचे कादंबरी लेखन सुरू झाले होते.

१९५० च्या आसपास दोन- तीन वर्षांत मराठी कादंबरीत नव-चैतन्य व नवी जाणीव दिसू लागली. या नव्या जाणीवेचा स्पष्ट आविष्कार म्हणजे विभावरी शिरुरकरांची " बळी" ( १९५०) ही कादंबरी होय. " हिंदोळ्यावर " ( १९३४) " विरलेले स्वप्न " (१९३५) या कादंबऱ्या लिहून स्त्रियांच्या व्यथा, वेदना शब्दबध्द करणाऱ्या विभावरींनी " बळी " या कादंबरीत गुन्हेगार म्हणून घोषित झालेल्या मांग-गारुडी समाजाच्या जीवनाची शोकात्मिका वर्णन केली. विभावरींच्या मनात निर्माण झालेल्या त्या समाजाविषयीच्या अपार जिव्हाळ्यातून बळीचे लेखन झाले आहे. मात्र हा जिव्हाळा भाबडा नाही. या समाजात गुन्हेगारी वृत्ती का निर्माण होते याचा शोध घेण्याचा प्रयत्न विभावरींनी केला आहे. दलित साहित्याच्या चळवळीनंतर रूढ झालेल्या अर्थाने बळी हा ग्रामीण कादंबरी म्हणता येणार नाही. तथापि या कादंबरीतील व्यक्तिरेखा आणि जीवन चित्रण ग्रामीणच आहे. म्हणूनच वि. स. खांडेकरांनी बळी या कादंबरीचा समावेश ग्रामीण कादंबरी वाङ्‌मयात केला आहे.

विभावरी शिरुरकर यांची " बळी " ही कादंबरी गुन्हेगार जमातीचे दुःख मांडणारी कादंबरी आहे जे दुःख विभावरी शिरुरकर यांनी " क्रिमिनल ट्राईब सेटलमेंट " मध्ये नोकरी करीत असताना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले त्या अनुभवालाच शिरुरकर यांनी " बळी " या कादंबरीतून साकार केले आहे.

या कादंबरीत जरी जात बांधवांनी आबाचा बळी दिला असला तरी विभावरी शिरूरकर यांनी या कादंबरीतून असा निष्कर्ष काढला आहे की, आबाचा बळी जातबांधवानी घेतला नसून इथल्या समाजव्यवस्थेने घेतला आहे, आणि त्यांचा हा निष्कर्ष रास्त आहे. इथल्या समाजव्यवस्थेनेच त्यांना गुन्हेगार केले आणि गुन्हेगारीचा त्यांच्यावर शिक्का मारून त्यांच्या संपूर्ण जीवनावर निर्बंध घातले ज्या गुन्हेगारी जगातून बाहेर पडू पहात होता म्हणून त्याचा बळी गेला.

" बळी " कादंबरीतील आबा आणि त्याची आई या दोन व्यक्तिरेखा हृदयस्पर्शी झाल्या आहेत. आबा हा परिस्थितीमध्ये सुधारणा व्हावी म्हणून हौतात्म्य करतो, तर आबाची आई आपल्या मुलांच्या पालनपोषणांसाठी आपली अश्रु पिते तर ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीचे प्रतिनिधित्व करणारे रिपनसाहेब असा प्रमुख व्यक्तिरेखांच्या आधारे कादंबरी साकार केली आहे.

विभावरी शिरूरकर यांच्या " हिंदोळ्यावर", " विरले स्वप्न" " बाई " " दोघींचे विश्व " " शबरी " या कादंबऱ्यांपेक्षा " बळी " या कादंबरीची जातकुळी वेगळी असून ग्रामीण संस्कृतीत आणि शिष्टांच्या वर्तुळाने निर्माण केलेल्या " पददलित " असा मांग गारुडी जातीचे वास्तवदर्शक चित्रण या कादंबरीतून साकार केले आहे. या कादंबरीने मराठी कादंबरीला वस्तुनिष्ठतेचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. म्हणून ही कादंबरी महत्वाची आहे.

ग्रामीण कादंबरी प्रामुख्याने १९६० नंतर भरभराटीला आलेली असली तर त्या अगोदरच्या दोन कादंबऱ्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणाऱ्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाच्या आहेत. त्यात विभावरी शिरूरकर यांची " बळी " १९५० आणि व्यंकटेश माडगूळकरांची " बनगरवाडी " १९५५ ह्या दोन कादंबऱ्या होत.

विभावरी शिरूरकरांच्या नंतर मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात ठळकपणे पुढे येणारे नाव म्हणजे श्री. ना. पेंडसे प्रथम कोकणाच्या राकट पार्श्वभूमीवरच आपल्या अप्रतिम कादंब-या लिहून कोकणाच्या जीवनाच्या वैशिष्ट्याला आकार केले व प्रख्यात कादंबरीकार हार्डीप्रमाणे सजीव पार्श्वभूमीवर कथानकाची रचना केली. " हद्दपार " " एल्गार " " गारंगीचा बापू " " हत्या " या सुरवातीच्या कादंब-यातील पात्रांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणजे हर्णै बंदराच्या परिसरातील उत्तर कोकणचा प्रदेश हा प्रदेश जीवनानुभवाची अपरिहार्यता म्हणून येतो. पेंडसेंनी आजरपेंडी, दापोली, हर्णै, आंजर्ले परिसरातील कोकणचा निसर्गसमृध्द प्रदेश तेथील मानवी जीवनासह प्रभावीपणे चित्रित केल्यामुळे प्रादेशिक कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली.

नवकथा घडविणा-या विनोच्या कथाकारात स्थान मिळविल्यानंतर व्यंकटेश माडगूळकरांनी कादंबरी लेखनास हात घातला. अनुभवाच्या वेगळेपणामुळे त्यांची कथा मराठीत उठून दिसली होतीच, दलित जीवन हा त्यांच्या अनेक कथांचा विषय आहे. त्यांची " पुढच पाऊल " ( १९५० ) ही पहिली कादंबरी दलित कलावंताची कथा वर्णन करते.

व्यंकटेश माडगूळकरांची " बनगरवाडी " १९५५ साली प्रकाशित झालेली कादंबरी ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहातील महत्वाची कादंबरी होय. या कादंबरीतून माडगूळकरांनी ग्रामीण परिसरातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनातील अनेक पैलूवर प्रकाश टाकला आहे. सामान्यतः स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेड्यात जे बदल झाले त्यावर ही कादंबरी भाष्य करते.

या कादंबरीत " बनगरवाडी " या धनगरांची वस्ती असलेल्या खेड्याचे चित्रण माडगूळकरांनी केले असून स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामसुधारणेसाठी खेडोपाडी शिक्षण पोहोचविण्याच्या दृष्टीने जे प्रयत्न सुरु झाले त्या शिक्षण प्रसाराच्या मार्गातील नेमक्या अडसरावर या कादंबरीने लक्ष केंद्रित केले आहे.

राजाराम गोंदणीकर या मास्तराची " बनगरवाडी " येथील शाळेवर बदली होते परंतु या खेड्यात शाळेत येण्यासाठी मुलेच नसल्याने ही शाळा अनेक वर्षांपासून बंद असते. या शिवाय आपली मुलं शाळेत पाठविण्याच्या मनःस्थितीत नसतात कारण मुलगा थोडा चालता-बोलता झाला की शेळ्या, मेंढ्या सांभाळण्यासाठी हातभार लावतो. त्यामुळे मुलाला शाळेत पाठविणे म्हणजे आपले आर्थिक नुकसान करणे आणि मुलाला रिकामटेकड्या बनविणे अशी धारणा " बनगरवाडी " तील ग्रामस्थांची असल्याने येथे शाळा असून ओस पडलेल्या अवस्थेत असते. राजाराम मास्तर ही शाळा झाडलोट करून स्वच्छ करुन घेतात आणि पालकांच्या मनात हळूहळू परिवर्तन करुन शाळा नावारुपाला नेतो. एकवेळ शाळेसाठी पालक-यांचा विरोध असतो पण आता तेच गावकरी श्रमदानातून नवी शाळा बांधतात, शाळेच्या जोडीला तालीमही बांधली जाते. पुढे दुष्काळ पडतो आणि परिश्रमाने उभारलेली " बनगरवाडी " ओस पडते. राजाराम मास्तरांनी उभारलेली शाळा, तालीम आणि त्यांच्या स्वप्नातील बनगरवाडी या निसर्गकोपाने उद्ध्वस्त होते. पोट भरण्यासाठी बनगरवाडीतील सर्व धनगर बाहेरगावी निघून जातात.

" माडगूळकरांनी " बनगरवाडीत " चित्रित केलेले ग्रामीण जीवन वास्तवपूर्ण असे आहे. परंपरागत जीवन मांडताना माडगूळकरांनी " मावल्या आई " च्या यात्रेचा प्रसंग चितारला आहे. ग्रामीण माणूस धर्मश्रध्दाळू असल्यामुळे बनगरवाडीतील धनगर " मावल्या आई " ला आपले दैवत मानतो. आपल्या कुटुंबाचे आणि विशेषतः आपल्या

गॅंढराचे संरक्षण करणारी ही देवता असल्यामुळे या देवीला ते नवसही करतात. त्यांची या देवीवर अपार श्रध्दा आहे. याचे उदाहरण म्हणजे - बाळ्या धनगराला या गावाने वाळीत टाकले. बाळ्याला त्याचे विशेष वाटत नाही. परंतु मावल्या आईचा प्रसाद त्याला गावकरी मिळू देत नाहीत म्हणून तो शरण येतो.

जशी धार्मिक वृत्तीची माणसं बनगरवाडीत आहेत तशी वाईट प्रवृत्तीची आहेत. पत्नी असतानाही अंजी बरोबर संबंध ठेवणारा शेकू, कोणाचीही पर्वा न करता मुक्तपणे जीवन जगणारी अंजी तर बाईला पळवून नेणारा जगण्या रामोशीही बनगरवाडीत आहे तसेच राजाराम मास्तरसारखे निष्ठावान आणि चांदीच्या रुपयाची मोड मोजता येत नाही म्हणून३४० रुपयांची मोड न मोजता राजाराम मास्तरांकडे ठेवणाऱ्या रामासारखी विश्वासू माणसेही बनगरवाडीत आहेत.

ग्रामीण जीवनाचा वास्तवपूर्ण आविष्कार या कादंबरीतून माडगूळकर यांनी केला असला तरी ग्रामीण वातावरणाला साजेशी अशी ग्रामीण भाषा संवादातून प्रत्ययास येते. मात्र ग्रामीण वातावरण साकार करण्यासाठी बनगरवाडीतील घरांचे, गॅंदराच्या, धुरट वासाचे शेताचे शिवाचे विस्ताराने केलेले वर्णन यातून ग्रामीण जीवनातील दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दाळूपणा अशा अनेक घटना प्रसंगानी ही कादंबरी ग्रामीण जीवनाचा जिवंत प्रत्यय देणारी आहे हे निश्चित.

" बनगरवाडी " या कादंबरीने प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. प्रादेशिक कादंबरीत विशिष्ट भौगोलिक परिसरात जीवन जगणाऱ्या मानवसमूहाचे दर्शन घडते असे आपण म्हणू लागलो ते " बनगरवाडी" मुळेच

गो. नी. दांडेकरांच्या कादंबरी लेखनात एक प्रकारची उत्क्रांती झालेली आढळते. शालेय जगतासाठी लिहिलेल्या बोध परायण कथांपासून तो " शितू " सारख्या चिरमधूर प्रेमकथेपर्यंतच्या त्यांच्या कथा निर्मितीचा झालेला विकास खरोखर विलोभनीय आहे. " शितू " मध्ये स्वरूपातील प्रादेशिकतेचे दर्शन घडविले आहे. शितूच्या विसूवरील प्रेमाची ही दिव्य गाथा प्रादेशिक पार्श्वभूमीवर चित्रिलेली आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली समाजव्यवस्था उद्ध्वस्त होत चाललेली आहे. हे पाहून गोपीदा व्यथित होतात. यातूनच " पडघवली " (१९५५) सारखी कादंबरी लिहिली आहे. वेगवेगळ्या अनुभव क्षेत्राचा शोध आणि त्याचे प्रभावी सादरीकरण हे प्रादेशिक ग्रामीण वाङ्मयाचे वैशिष्ट्ये आहे.

१९५० ते १९६० या काळात पेंडसे, दांडेकर, माडगूळकर यांच्या ग्रामीण कादंबरींचे एकूणच मराठी कादंबरीच्या संदर्भात महत्वाची भर पडली याच काळात ग्रामीण कादंबरीला प्रादेशिकतेचा स्पर्श लाभला. जीवनाकडे ती अधिक वेगाने गंभीरपणे पाहू लागली. सुमारे १९४७ ते १९७० मधील एल्गार, वळी, बनगरवाडी, गावगुंड, पडघवली, हद्दपार या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात स्वतंत्र आणि वैशिष्ट्य-पूर्ण स्थान प्राप्त केले. या कलाकृतींचा गौरवपूर्वक उल्लेख करावा लागतो. १९६० पर्यंतचे जीवनानुभव अधिकृत करणारी संपन्न व्यापक मानवतावादी बनली.

हमीद दलवाई यांनी १९६५ मध्ये " इंधन " ही कादंबरी लिहून मराठी वास्तववादी साहित्याला पुष्टी दिली. हमीद दलवाईंना प्रामुख्याने कृतिशील सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जाते.

हमीद दलवाई यांच्या " इंधन " या कादंबरीत ग्रामीण पातळीवरील तीन अहंकारी प्रवृत्तीचे चित्रण केले आहे. खोतीची पध्दत गेल्याने मस्तीने वागणारे मुसलमान, कोणाचीही पर्वा न करणारे कुणबी तर अहंकाराने वागणारे बौध्द असा तीन प्रवृत्तींतील कलह दलवाईने मध्यवर्ती कल्पिला आहे.

" इंधन " ही कादंबरी कोकणाच्या परिसरातून साकार झाली आहे. कादंबरीतील नायकाचे वडील " दादा " हे एका काळचे खोत होते. इसाक हा त्यांचा थोरला मुलगा, इसाकचे ब्राह्मणांच्या मुलीशी शारीरिक संबंध होते त्याच्या पत्नीला माहित असूनही ती शांत राहिली. मात्र या कादंबरीचा नायक आणि इसाकचा भाऊ त्याला हे सहन होत नाही. दोघा भावांचे भांडण होते आणि नायक मुंबईला जाण्याचा निर्णय घेतो. शिवाय राजकारणाचा ओढा असल्याने त्या गावात त्याचे पाय थांबत नाहीत. पुढे पंधरा वर्षांनंतर हा नायक विश्रांतीसाठी येतो. कुळवाड्यांनी गवतात गुरे घातल्यामुळे इसाकचे आणि कुळवाड्यांचे भांडण झाले. परंतु या भांडणामागे खरे कारण इसाक व ब्राह्मणांची मुलगी यांचे संबंध होत. मुलगी पिपाशिंनी अजाणताचं इसाकने तिला व्यभिचारासाठी प्रवृत्त केले होते. तसेच पूर्वीचे महार आणि सध्याचे बौध्द यांची एक मुलगी लक्ष्मी तिचे इसाकशी संबंध होते म्हणून लक्ष्मीच्या नवऱ्याने तिला इसाकच्या घराच्या बांधकामावर काम करण्यास मज्जाव केला त्यामुळे इसाकने तिला लपविले तर बौध्दांच्या मंडळीने इसाकच्या घरात घुसून लक्ष्मीला परत नेले त्यामुळे बौध्द आणि इसाक यांच्यात संघर्षाला प्रारंभ झाला. पूर्वी कुळवाडे आणि इसाक यांच्यामध्ये गवतात गुरे घातल्यामुळे तणाव निर्माण झालेला त्यात भर म्हणजे इसाकने मुसलमानांची एक बैठक बोलविली आणि या बैठकीत बौध्द व कुळवाड्यांनी माफी मागावी असा एकमुखी निर्णय घेतला त्यामुळे चिडलेले बौध्द आणि कुळवाड्यांनी मुसलमानांच्या शेतात चोऱ्या

करण्यास प्रारंभ केला आणि या गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले. अशा वातावरणात महालक्ष्मीची पालखी निघाली पालखीवाल्यांनी मशिदीसमोरुन जाताना वाद्य बंद केले नसल्यामुळे मुसलमान चिडले आणि त्यातून जातीय दंगलीला प्रारंभ झाला. या दंगलीत मुसलमानांनी हिंदू स्त्रियांची इज्जत लुटली त्यामुळे गावाचे वातावरण संतप्त होते या कादंबरीचे कथानक असे जातीय व धार्मिक वैमनस्यातून आकार घेते.

" इंधन " ची समग्र कथाच मुळात धर्मश्रध्देला थारा न देता राष्ट्रीयत्वाच्या भावनेवर भर देणारी आहे. कादंबरीचा नायक मुसलमान असला तरी तो पुरोगामी विचारांचा आहे. परंतू या कादंबरीतील गाव परंपरावादी असून अनेक अपप्रवृत्तीने ग्रासलेले आहे. उदाहरणार्थ सासऱ्याच्या वासनेला बळी पडलेली सुद्रामाची सुन, व्यभिचारी परटीन, नवऱ्याशिवाय इसाकबरोबर संबंध ठेवणारी लक्ष्मी तसेच बरोबर संबंध ठेवणारी ब्राह्मण कन्या सुमती असे वासनेच्या आधीन झालेला गाव दलवाई यांनी उभे केले आहे. कादंबरीतील संघर्षाला स्त्रियाचं कारणीभूत झालेल्या दिसतात.

हमीद दलवाई यांनी जी कोकणाच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी लिहिली. त्या पार्श्वभूमीला साजेशी अशी कोकणातील मुसलमानांची बोलीभाषा उपयोगात आणून निश्चितं असा परिणाम साधला.

हमीद दलवाईंच्या नंतरचे महत्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणजे जयवंत दळवी खरे पाहता त्यांना ग्रामीण कादंबरीकार म्हणून फारसे कोणी ओळखत नाही. कारण त्यांचे नाव घेतले की प्रथम त्यांची "चक्र" ही महानगरीय झोपडपट्टी जीवन चित्रण करणारी कादंबरी आठवते. " चक्र " बद्दल उषा हस्तक लिहितात, " चक्र ने मराठी कादंबरीला नव्या अनुभवविश्वाची जोड दिली आहे आणि प्रादेशिकतेची कोंडी फोडली आहे ".[१२]

दळवींनी जसे शहरी मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण समर्थपणे केले तसेच विनोदी लेखनही हिरीरीने केले आहे. काही कादंब-यातून कोकणी प्रादेशिक जीवनही अविष्कृत केले.

१९६० नंतरच्या कालखंडामध्ये मराठी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात अनेक महत्वाच्या लेखकांचा उदय झाला. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे, हे एक महत्वाचे लेखक होत. अण्णाभाऊ साठे जन्माने दलित असले तरी त्यांनी ग्रामीण साहित्याचीच निर्मिती केली. अण्णाभाऊ स्वतःला ग्रामीण लेखक म्हणून घेत. तथापि त्यांच्या कादंब-याचे स्वरुप लक्षात घेता त्यांना ग्रामीण कादंबरीकार म्हणून विचार करणे संयुक्तिक ठरते.

गावागावाच्या आणि घराण्यांच्या आपसातील वैराच्या कहाण्या हा त्यांच्या अनेक कादंब-याचा विषय आहे. ही वैर कधी प्रतिष्ठेसाठी तर कधी अब्रूसाठी खेळली जातात. त्यामुळे त्यांच्या कादंब-यामध्ये संघर्ष आणि त्यातून उद्भवणा-या नाट्यमय घटनांना साहजिकच प्राधान्य मिळते. अण्णाभाऊंच्या कादंब-यांची रचना अशी रंजनाकुल आहे. सुसुंदर नायक नायिका, प्रणयप्रसंग, रहस्ये, योगायोग हे रंजनाचे सांकेतिक घटक त्यांच्या कादंब-यात येतात.

उध्दव शेळके यांच्या " धग " ( १९६०) या कादंबरीमुळे मराठी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर पडली. किंबहुना मराठी कादंबरीने धग मुळे प्रवाहाची दिशा बदलली. तिचा प्रवास आता वास्तववादी भूमिकेतून होऊ लागला. शेळकेंनी प्रचलित तंत्र झुगारून ग्रामीण वास्तवाचा समर्थ आविष्कार घडविला. " धग " विषयी म. सु. पाटील लिहितात-
" धग " ही कठोर वास्तवाचे कलात्मक रूप अविष्कृत करणारी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येईल .[२०]

उध्दव शेळके यांनी विपूल कादंबऱ्या लिहिल्या आहेत. १९६० साली प्रकाशित झालेली " धग " ही कादंबरी महत्वाची अशी आहे.

" धग " कादंबरीत शेळके यांनी शिंप्यांच्या जीवनाचा वेध घेतलेला आहे. खेड्यातील पारंपरिक असा शिंप्यांचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाची ही करूण कहाणी आहे. शिंपी असला तरी तो एक माणूस आहे. त्यालाही आकांक्षा आहेत त्यामुळे तो जगण्यासाठी धडपडतो आहे. आपल्या कुटुंबियांना सुखात ठेवण्यासाठी सतत राबतो आहे. त्यांच्या कुटुंबातील दैनंदिन घटनावर या कादंबरीचे कथानक अधारित असल्यामुळे बंदिस्त असे कथानक या कादंबरीला नाही परंतु दैनंदिन घटनांची मांडणी उध्दव शेळके यांनी अशी केली आहे की, त्यातून शिंपी कुटुंबाचा समग्र पट आपणापुढे साकार होतो. कायाड कष्टात बुडून गेलेले महादेव आणि कौतिक यांच्या आशा-निराशांनी हिंध कादंबरी साकारली आहे. लहान सहान प्रसंगातून ते दुःखद जाणिवा अभिव्यक्त करतात. उदाहरणार्थ दिवाळीच्या सणाला आपल्या मुलांना थोडथोड खायला मिळावे म्हणून त्यांनी व उपसलेले कष्ट, परंतू मुलांच्या कपड्यात संपूर्ण पैसे संपतात म्हणून कपड्यापेक्षा मुलांना गोड जेवण देणे अधिक बरे म्हणून कपडे परत करावे लागतात त्या पैशावर दिवाळी साजरी करावी लागते. असे कितीतरी छोटे छोटे प्रसंग या कादंबरीत गुफलेले आहेत. त्यातून अस्सल असे ग्रामीण वास्तव साकार होते. कादंबरीचा शेवट शेळके यांनी थोड्या वेगळया पध्दतीने केला आहे. कुटुंबाचे भरण पोषण करणाऱ्या महादेवला महारोग होतो तर कौतिक वेडी होते त्यामुळे या कुटुंबाची संपूर्ण वाताहत होते. आपल्या कुटुंबाला वेगवेगळया मार्गांने सावरु पाहणाऱ्या कौतिकला नियतीने हतबल करविले पराभूत दुबळी पण लढणारी कौतिक आपल्या समोर उभी राहते.

हया कादंबरीतून शेळके यांनी खास विदर्भातील बोलीभाषा उपयोगात आणल्यामुळे कादंबरीतील प्रसंग अधिक बोलके झाले आहेत. तसेच विदर्भातील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाचाही यथायोग्य उपयोग केल्यामुळे विदर्भाच्या प्रादेशिक वैशिष्टयाच्या दृष्टीनेही या कादंबरीचे महत्व आहे.

शंकर पाटलांनी ग्रामीण जीवनाचा आणि तेथील माणसांचा वेध घेणारी कथा लिहून मानाचे स्थान मिळविले त्यांनी ग्रामीण परिसरातील माणसांच्या व्यक्तीमनाचे पदर न पदर सहजपणे उलगडून दाखविले. पाटील यांनी आपल्या कथालेखनात सतत प्रयोग केले. अशा-प्रकारे ग्रामीण कथाकार म्हणून स्थिर झाल्यानंतर शंकर पाटील यांनी " टारफुला " ( १९६४) ही कादंबरी लिहिली.

शंकर पाटील एक ग्रामीण कथाकार म्हणून परिचित असले तरी ग्रामीण कादंबरीकार म्हणून त्यांच्या " टारफुला " या कादंबरीने मान्यता मिळवून दिली.

" टारफूला " ही कादंबरी तीन विभागात विभागली असून, गावातील गुंडगिरीने पोखरलेले गाव शंकर पाटील यांनी या कादंबरीतून मांडले आहे. पिकात वाढलेले टारफूला अथवा काटवन पिकाला जसे मारक असते तसे काटवनाप्रमाणे वाढलेली गावातील गुंडगिरी संपूर्ण गावच उद्ध्वस्त करते आणि " टारफूला " विनाक दैण्यामागची पाटलांची भूमिका दिसते. आणि हया मध्यवर्ती कल्पनेवर ही कादंबरी उभारली गेली आहे.

या कादंबरीला खरा प्रारंभ होतो आहे गावचा कर्ता पाटील मारल्यानंतर, गावचा पाटील मारतो आणि दत्तकाच्या निमित्ताने गुंडामध्ये भांडणाला प्रारंभ होतो आणि त्यात भर म्हणजे शासनाकाने नियुक्त केलेला पाटील गावाचे भले करण्याऐवजी गुंडाना हाताशी धरून गावावर वचक बसविण्यासाठी दहशत निर्माण करतो. त्यामुळे सगळे गाव भयभीत झाले आहे आबा कुलकर्णी यांचे कुटुंब भीतीपोटीच संपते.

आबा कुलकर्णींने या बाबीची इतकी धास्ती घेतली आहे की, या गावापासून आपली नाळ तोडून एकाकीपणे जीवन जगण्याचा अट्टाहास चालविला आहे, अवतीभवतीच्या वस्तू व्यक्ती व प्रसंगातून आबा कुलकर्णी या दहशतीने खचून गेल्याचे हुबेहूब चित्र शंकर पाटलांनी रेखाटले आहे.

या कादंबरीतून शंकर पाटलांनी जे दहशतीचे चित्र उभे केले आहे त्यातून उग्रता आणि दाहकता प्रत्ययास येते. उदाहरणार्थ खुरप्याने डोळे काढलेला कोळ्याचा प्रसंग याची साक्ष होय या कादंबरीत त्यांनी निवेदनापर विशेष भर देऊन संवादातून त्याची भीषणता प्रकट केली आहे. शिवाय ग्रामीण भाषेचा जोडीला नागर भाषाही वापरली आहे. मात्र त्यांची ग्रामीण भाषा अधिक ठसणारी आहे वाचकाला गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य या कादंबरीत असूनही पाल्हाळीक आणि पुनरुक्तीचे दोष " फारफुलात " जाणवतात.

या कादंबरीत रचनेचे रूढ संकेत झुगारून जीवनानुभवाची मांडणी झाली आहे. येथे व्यक्तींना केंद्रवर्ती स्थान लाभलेले नाही. लेखकाने कथारचनेची गुंतागुत न करता गाव आणि गावच्या सत्तेसाठी चालणारा संघर्ष रंगविला आहे. शंकर पाटील यांनी ही कादंबरी लिहून मराठी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर टाकली आहे.

शंकर पाटील यांच्या नंतर बोराडे-यादव यांची कादंबरी हा साठोत्तर ग्रामीण कादंबरीचा लक्षणीय टप्पा ठरतो. यांची कादंबरी जीवनाशय आणि भाषा या दोहोबाबत ग्रामीण संवेदनशीलतेच्या अधिक निकट नेली. बोराडे यांची " पाचोळा " ( १९७१ ) ग्रामीण बोली भाषेत लिहिली गेली मराठीतील पहिली कादंबरी आहे.

रा. रं. बोराडे हे ग्रामीण कथाकार म्हणून परिचित असले तरी त्यांनी वगनाट्य, नाटक आणि कादंबरी लेखनातून स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांनी " पाचोळा " ( १९७१) आणि " आवठ " अशा दोन कादंब-या लिहिल्या आहेत. परंतु " पाचोळा" कादंबरीने बोराडे यांना लौकिक प्राप्त करुन दिला आहे.

" पाचोळा " ह्या कादंबरीत शहरीकरणामुळे उजाड होत चाललेले पारंपारिक व्यवसाय आणि त्यावर उपजीविका करणा-या कुटुंबाची होत असलेली वाताहत केंद्रवर्ती धरलेली आहे.

गंगाराम हा कपडे शिवणारा खेड्यातील एक साधा शिंपी असून या व्यवसायावर कुटुंबाचा चरितार्थ चालतो आहे. परंतु गरडाच्या पोराशी झालेले भांडण गंगाराम शिंप्याला महागात पडते. केवळ द्वेषापोटी गरड गावात नविन शिलाई यंत्र घेऊन येतो आणि त्याचबरोबर शहरात प्रशिक्षित झालेल्या शिंप्याला आणले जाते. नविन शिलाई यंत्र आणि नविन पध्दतीने कपडे शिवणारा शिंपी आल्याने गंगारामकडील गि-हाईक तिकडे पळते. त्यामुळे गंगारामचा व्यवसाय बसतो. आणि त्यांच्या कुटुंबाची वाताहत होते. आपल्या मुलाला प्रशिक्षित करण्याचा गंगारामचा मनोदय असतो, पण हा मुलगा बापाचा व्यवसाय करण्यास नकार देतो त्यामुळे बाप-लेकात ताण निर्माण होतो. व गंगारामचे संपूर्ण कौटूंबिक जीवन पूर्णतः कोलमडते.

घटना निवेदनातून ही कादंबरी अधिक गतिमान होत जाते. नव-याचा हट्टीपणा आणि बापाचा गुणानेयुक्त असा मुलगा यांच्या कोंडीत सापडलेली गंगारामची पत्नी पारवती हिचे आयुष्य कसे " पाचोळा" होत चालले आहे हे तिच्या तोंडी घातलेल्या निवेदनातून प्रत्ययास येते. शिवाय या निवेदनाला साजेशी अशी बाज मराठवाड्यातील उस्मानाबादची मराठी बोली, जोडीला म्हणी आणि वाक्प्रचार यांचा केलेला यथायोग्य उपयोगाने यामुळे परिणामकारकता साधण्यात बोराडे यशस्वी झाले आहेत.

" पाचोळा " चे लक्षणीय स्थान मान्य करुनही ती " धग " च्या पावलावर पाऊल ठेवून आकाराला आलेली आहे असे म. सु. पाटील यांनी म्हटले आहे. तथापि " धग " प्रमाणे " पाचोळा " ही शिंपी कुटूंबाची कहाणी आहे.

ग्रामीण साहित्यातील महत्वाचे एक नाव म्हणजे आनंद यादव हे होत. त्यांनी कथा, कविता, वगनाटय, ग्रामीण साहित्य समीक्षा आणि कादंबरी असे विविध प्रकार हाताळून ग्रामीण साहित्याला समृध्द केले. त्यांच्या ग्रामीण कादंबरीला या क्षेत्रात प्रतिष्ठा मिळाली आहे. " नटरंग ", " एकलकोंडया", " माऊली " इ. कादंबऱ्या लिहिल्या परंतु त्यांच्या " गोतावळा" कादंबरीला जे स्थान प्राप्त झाले आहे ती जागा इतर कोणत्याही कादंबरीला घेता आली नाही यंत्र संस्कृतीमुळे उध्वस्त होत असलेली ग्रामीण संस्कृती हया कथाबीजावर " गोतावळा " कादंबरी आधारित आहे. झोंबी, नांगरणी, घरभिंती या तीन पुस्तकातून आनंद यादवांचे चरित्र स्पष्ट होते. आत्मचरित्र आणि कादंबरी या दोन प्रकारचा संकर जणू अनुभवास येतो.

" गोतावळा "तील नारबा हा ग्रामीण संस्कृतीचे एक प्रतिकात्मक रूप म्हणून त्याचा जीवनपट यादवांनी मांडला आहे.

नारबा हा रामू सोनपडाच्या शेतात काम करणारा मालकरी नोकर असून, तो अनाथ आहे. त्याचं जवळचं अस कोणी नसल्यामुळे त्याची मैत्री, बैल, रेडा, घोडा, कुत्रा, कोंबडा, कोरडे आणि विहिरीतील कासवाशी होते. तो त्यांच्याशी बोलतो, मनातले हितगुज सांगतो त्यांच्या रूपात आपल्या भावना किंवा वासना शमवितो. हा सगळा गोतावळा त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग असून त्याच्याशिवाय नारबाला आपले स्वत्व नाही म्हणून तो म्हणतो की, " जनावर बर, वरं माणसं नगतं " माणसापेक्षा निरागस असे प्रेम नारबाला या गोतावळयातून मिळते परंतु असे शेतीशी, प्राण्यांशी आणि

निसर्गाशी एकरूप असे झालेले नारबाचे जीवन शेतात ट्रॅक्टर घुसल्याने उध्वस्त होऊ लागते. ट्रॅक्टर आल्यामुळे आजवर शेतीसाठी उपयुक्त ठरलेली बैलजोडी निकामी ठरते. या यंत्राची भूक भागविण्यासाठी या नारबाच्या गोतावळ्यातील एक एक घटक विकला जातो. बैल, पाडी, रेडा, कोंबडा, शेरड्या विकल्या जातात. शिवाय या गोतावळ्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आंधळा घोडा मरतो, चंपी कुत्री फाडली जाते आणि नाम्या कुत्राही मरतो हा संपूर्ण कुत्रा मालकासाठी राबला परंतु व्यवहारी मालकाने " कामसरो.. ." या म्हणीप्रमाणे निकामी झालेल्या नारबाची जीवसृष्टी उध्वस्त करून टाकली.

आनंद यादव यांची " गोतावळा " यासाठी महत्वाची आहे. या कादंबरीने प्राण्यांच्या व्यक्तिमत्वाचा पहिल्यांदा जिवंत प्रत्यय घडविला. मुक्या जीवाला बोलका करायला लावणारी मराठीतील ही पहिलीच कादंबरी असावी. कादंबरीची भाषाही अधिक लवचिक आणि परिणामकारक आहे. प्रतिमा, विशेषणे, क्रियापदे, क्रियाविशेषणे यांच्या मिश्रणाद्वारे गोतावळ्यातील भाषा अधिक काव्यात्मक झाली आहे. निसर्गाला मानवी पातळीवर आणणे यांची त्यांची हातोटी निश्चित लक्षणीय आहे. मात्र ही कादंबरी बदलत्या काळाला सामोरे जात नाही. नारबा यांत्रिकीविरुद्ध जीवनात अडकून पडला म्हणून त्याची शोकात्मिका होत गेली. जर नारबा शेतीच्या बदलत्या रंगाबरोबर रंगत गेला असता तर त्याची अशी परवड झाली नसती तो गोतावळ्यातच इतका रूतून बसला की, त्यातून बाहेर काढणे शक्य नाही. त्यामुळे सर्वार्थाने ही कादंबरी यशस्वी झाली असली तरी संपूर्ण गावपातळीवरील जीवन चित्रणात येत नाही, तर ती नारबाच्या परिवारापर्यंत मर्यादित राहते.

कथा आणि कादंबरी या दोन्ही क्षेत्रात लेखन करणारे महादेव मोरे हे मोठ्या ताकदीचे लेखक आहेत. त्यांचे लेखन सातत्याने सुरु असून आतापर्यंत त्यांनी अनेक कथासंग्रहाबरोबर " पालखणा " ( १९६६) " एकोणिसावी जात " ( १९६८) " पनोती " ( १९६९) " रेत " ( १९७१ ) " बळी " ( १९७२ ) इत्यादी अनेक कादंब-या लिहिल्या आहेत. पांढरपेशी विश्वाच्या कक्षेबाहेरील शेतमजूर, विडीकामगार, ड्रायव्हर, क्लिनर, वेश्या-वेश्यांचे दलाल, जोगते - जोगतिणी आदी तळागाळातील माणसांचे आणि मांग-गारुडी, डोंबारी, आदी विमुक्तांचे जग चित्रित करण्यासाठी मो-यानी आपली लेखनी झिजवली.

मो-यांना वेगळ्या स्वरूपाच्या जीवनचित्रणाची आसाशी असली तरी त्यांनी कुठले प्रयोग केलेले नाहीत. नाही म्हणायला " पालखणा" आणि " रेत " या कादंब-या त्यांनी ग्रामीण निवेदन शैलीत लिहिल्या आहेत. ते चित्रित करीत असलेले जग नाविन्यपूर्ण आणि वैचित्र्यपूर्ण खरेच परंतु आपल्या अनुभवविश्वाविषयी अभिनिवेशी वाटावी या स्वरूपाची जाणीव आणि पांढरपेशा समाजाविषयी व त्याने निर्मिलेल्या मूल्यांच्या निकषांविषयी एक प्रकारचा दुस्वास त्यांच्या मनात आहे.

शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे यांच्या दरम्यान मधु मंगेश कर्णिक थोड्याफार प्रमाणात कोकणाच्या जीवनावर कादंबरी लेखन करीत होते. रणजित देसाई यांनी " बारी " " माझं गावं " या ग्रामीण कादंब-या लिहिल्या आहेत. याच दरम्यान ना. धों महानोरांची " गांधारी " कादंबरी निजामशाहीच्या रझाकारी जुलूमाखाली होरपळून निघालेल्या मराठवाड्यातील खेड्याचे चित्र रेखाटत होती.

ना. धो महानोर यांची " गांधारी " ( १९७३ ) ही कादंबरी एका खेडयाचा संपूर्ण जीवनपट मांडण्यासाठी लिहिली आहे. या कादंबरीत रझाकाराने जो हाहा:कार करुन गांधारी गाव उध्वस्त केले आणि नंतर स्थिर झालेल्या या गावाला राजकारणामुळे जी अस्थिरता आली, त्याचे चित्रण महानोर यांनी या कादंबरीतून केले आहे.

रझाकारांनी जी धसमुसळ पातळी गाठली होती त्याची झळ " गांधारी" लाही पोहोचली आहे. गांधारी गावात येऊन रजाकारांनी जाळपोळ केली, दागिने आणि संपत्तीची लुट केली. स्त्रियांची विटंबना केली परंतु रजाकार येणार याची वर्दी अगोदरच मिळाल्याने लोकांनी पलायन केले होते, त्यामुळे फारी जीवित हानी झाली नाही जयसिंग पहेलवान नसते असल्यामुळे रजाकाराच्या तावडीत सापडला आणि अत्यंत निर्दयीपणे त्याची हत्या केली प्रथम त्याला गावकुसाच्या बाहेर नेले. जंबिया त्याच्या दोन्ही मांडयात खुपसला नंतर दोन्ही हात आणि पाय कापले व शेवटी गोळया घालून त्याच्या शरीराचे तुकडे भवानीच्या मंदीराच्या गाभा-यात टाकले आणि लुट जाळपोळ करून ते निघून गेले. दोन तीन महिन्यानंतर गांधारी सोडून गेलेले लोक परत येऊ लागले. रजाकाराची संहार लाट संपली पण गावात जे राजकारण शिरले त्यांनी पुन्हा उग्ररूप धारण केले त्यातून भांडणे, कोर्टकचे-या वाढल्याने गांधारी पुन्हा अस्थिर झाली.

ना. धो महानोर यांनी " गांधारी" तील अनेक दुष्ट-दुष्ट प्रवृत्तीच्या माणसांचे चित्रण केले आहे. जयदेव आणि राजमल यांचे भ्रष्ट राजकारण, रिकामटेकडे गांजेखोर हे एक चित्र तर, दुसरीकडे भागवत-सारखा सुशिक्षित व निष्ठावान शेतकरी, कलाप्रेमी लालजी " गांधारी" ला परिवर्तनाकडे नेण्याचा प्रयत्न करतो पण आड येणारे राजकारण " गांधारी" चे स्वप्न साकार होऊ देत नाही. असे कोंडीत सापडलेल्या

गावाचे वास्तव चित्रण महानोर यांनी या कादंबरीतून केले आहे. ग्रामीण जीवनानुभवाचे इतके व्यापक प्रत्यंतर इतर कादंबऱ्यातून क्वचित निदर्शनास येते.

या पिढीनंतर म्हणजे सर्वसाधारणपणे १९८० च्या दरम्यान नवी ग्रामीण लेखकांची पिढी आली यात प्रामुख्याने नागनाथ कोत्तापल्ले अनंत मनोहर, पुरुषोत्तम बोरकर, विश्वास पाटील, मोहन पाटील, वामन पात्रीकर, मधुकर वाकोडे, वासुदेव मुलाटे भीमराव वाघचौरे, यांचा समावेश होतो. या लेखकांनी ग्रामीण कादंबरीचा अनेक दिशांनी विस्तार केला.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी " उलट चाललेला प्रवाह " "गांधारीचे डोळे " या कादंबऱ्यांमधून ग्रामीण परिसरातील राजकारणाचे आणि समाजव्यवस्थेचे चित्रण केले आहे. बदलती ग्रामीण व्यवस्था आणि त्यात बेचिराख होत चाललेली ग्रामीण संस्कृती याचे दर्शन या कादंबऱ्यात घडते. तसेच राजकीय व्यक्ती आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी अनेक अनैतिक मार्गांचा अवलंब करून ग्राममूल्य व्यवस्थेच्या मुळावर आघात करत आहे. राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे बदलत चाललेल्या व उलट प्रवाहाने वाहू लागलेल्या व्यवस्थेचे चित्रण कोत्तापल्ले यांनी तटस्थपणे रेखाटले आहे.

वासुदेव मुलाटेनी " विषवृक्षाच्या मुळ्या" मधून ग्रामीण भागातील सहकारी संस्थांचे राजकारण टिपण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वनाथ सहकारी संस्थेत नोकरी करत असताना दरवर्षी गाव बदलत राहतो. यामधून त्याला कोठेही समाधान मिळत नाही. प्रत्येक खेड्यापाड्यात भ्रष्टाचार पोहोचला आहे. शहरीकरणाचे लोण खेड्यापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे खेडीही भ्रष्ट होऊ लागली. या जाणिवेने तो अस्वस्थ होतो. या " विषवृक्षाच्या मुळ्या" आपण उपटून टाकू शकत नाही.

याची त्याला जाणीव झाल्याने तो अधिक हतबल होत जातो. विश्वनाथच्या संगतीमधून मुलाटधानी सहकारी संस्थातील भ्रष्टाचार, पाटर्या, अनैतिकता यावर प्रकाश टाकला आहे.

एकूणच ग्रामव्यवस्थेचे चित्रण करण्याचा प्रयत्न पुरूषोत्तम बोरकर " मेड इन इंडियांत " करतात. आधुनिकतेचे वारे खेड्यापर्यंत पोहोचले आहे यामध्ये गोरगरिबांची होळी होऊ लागली. भ्रष्टाचार माजला माणूस माणसाला पारखा झाला, हे सारे असह्य होऊन पंजाबराव पाटील परिवर्तनाच्या हेतूने सरपंच पद स्विकारतो केवळ ग्रामीण जीवनाच्या परिवर्तनाची आस त्याला नाही तर तो त्यासाठी स्वत:च्या जीवनाचा प्रयोग करण्याचा प्रयत्न करतो. तो म्हणतो - " याच जिवान्याले नाही कस म्हणावं ? व्हरायटी म्हणून हे बी लावून पाहावं आपल्या जिगारीच्या वावरात " ( पृ. ४) पण त्याचं स्वप्न हे स्वप्नचं राहते तो गाववाल्यांच्या दृष्टीने " धनचक्कर " बनतो यामुळे तो म्हणतो आपल्याजवळ आपलं असं ओरिज्यनल काहीचं नस्ते एका कल्पनेशिवाय ( पृ. ११७ ) ही जाणीवचं त्याला त्रस्त करून सोडते व शेवटी आपण फक्त " मेड इन इंडिया "च आहोत, ऑल ओव्हर इंडिया बनू शकलो नाही याचे मनस्वी दुःख त्याला होते.

बदलत्या युगाचे अनेक संदर्भ अनुस्यूत असणारी वामन पात्रीकरांची " जगबुडी " ही कादंबरी चेहरा-मोहरा हरवून बसलेल्या ग्रामीण परिसराचे चित्रण करते. राघव या परिसराचा म्हणजे " देऊळगावची " कहाणी सांगतो. बालपणी मिस्किल शैलीत, काव्यमय वातावरणात वाढलेल्या राघवची जाणीव वाढ होत जाते तस तसे त्याला येणारे अनुभवं विदारकं बनत जातात. यामुळे बालपणाला येत चाललेली प्रौढपणाचे आघात, वास्तव जीवनमूल्यांना उठत चाललेला विश्वास यामुळे

राघव हताबल बनतो. तो स्वत: मंत्री झाल्यावर तलाव आणि वीज-निर्मिती साठी मुकाटपणे देऊ करण्याची संमती देतो.

ही कादंबरी शेवटच्या टप्प्यात अधिक गतिमान झाली असली तरी, तिला लाभलेल्या तत्कालिन सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, स्थित्यंतराच्या परिणामामुळे ती उल्लेखनीय ठरली आहे. पारंपरिक कथानक, व्यक्तिरेखा या गोष्टींना गौण स्थान देऊन पारंपारिकतेपेक्षा वेगळी मांडणी केली आहे.

वि. ज. बोरकर, अनंत मनोहर, यांच्या कादंब-यामधून तसेच सुभाष भेंड्याच्या " जोगीण " सारख्या कादंब-यामधून कोकणचा परिसर अधोरेखित होत होता.

" कागूद आणि सावली " या लघु कादंब-यामधून आनंद पाटील यांनी ग्रामीण जीवनाचे चित्र रेखाटले आहे. " कागूद " मध्ये जमिनीची खरेदी हीच एक घटना आहे पण या निमित्ताने लेखकांने ग्रामीण परिसरातील कौटुंबिक वातावरण, राजकारण, भावकी, व्यक्ती-व्यक्तीमधील संबंधाचे सूक्ष्मपणे रेखाटन केले आहे. " सावली " मध्ये मुंबईला काम करुन पैसे साठवून घर बांधायला निघालेल्या धोंडिबाची कथा आहे. कुटुंबातील ताणतणावानिमित्ती आणि गावातील राजकारणानिमित्ती अत्यंत तटस्थपणे लेखकाने उध्वस्त होत चाललेल्या एकत्र कुटुंबपध्दतीचे परिणामकारक चित्रण केले आहे. ग्रामीण जीवनाचे सशक्त भान असलेले आनंद पाटील यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय तटस्थ आहे. ते जीवन जसेच्या तसे टिपून त्या जीवनाचे नव्या नैतिकतेने ते मूल्यमापन करु पाहतात यामुळे या कादंबरीतील " व्यक्ती" या त्या सामाजिकतेच्या बाहेर विचारच करता येत नाही. असाच प्रकारचे चित्रण " लिगाड " आणि " खांदेपालट"

या कादंब-यात आहे. शहरी संस्कृतीच्या संपर्कात जसजशी खेडी येऊ लागली तस तशी ती अधिक भ्रष्ट होऊ लागली. या भ्रष्ट राजकारणाचे, जातीयतेचे चित्रण " लिगाड " मध्ये येते तर " खांदेपालट " मध्ये आल्यावर स्वंचजीच्या खुर्चीला चिकटून राहणा-या व्यक्तींच्या प्रवृत्तीवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. भोगवादी सत्तापिपासू वृत्तीचे दर्शन या कादंबरीत अतिशय परिणामकारक झालेले आहे. ग्रामीण परिसरातील झुंडशाही, एककेंद्री सत्तापध्दती, बदलता समाज, ढासळती मूल्यव्यवस्था या सा-याचे चित्रण अधिक परिणामकारक बनले आहे.

विश्वास पाटील यांची " झाडाझडती " कादंबरी धरणग्रस्तांचे चित्र रेखाटते. तर " पांगिरा" सारख्या त्यांच्या कादंब-यामधून बदलत्या ग्रामीण निसर्गाचे व समाजव्यवस्थेचे चित्रण येते. भीमराव वाघचौरे यांनी " रानखळगी " च्या रूपाने मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त परिसर आणि दामोदर सारख्या युवकाच्या शिक्षणाची झालेली हालअपेष्टा चित्रित केली आहे. " पाणकळा" मध्ये ग्रामीण परिसरातील भावभावनांचे आणि त्यामधील स्वार्थी प्रवृत्तीचे चित्रण केले आहे. " शापित " सारख्या कादंबरीतून अरुण साधूनी मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त उध्दवस्त होत चाललेला संसार आणि खेडी यांचे चित्रण केले आहे. पण हे चित्रण मराठवाड्याच्या मातीचा स्पर्श सोडून शहरी जीवनाशी जवळचे वाटायला लागते

चंद्रकुमार नलगे आपली रोमॅंटिक प्रवृत्ती जपताना दिसतात. या वृत्तीचा प्रत्यय त्यांच्या " आगीत फुल " " गस्त " आणि " देवाची साद " या कादंब-यातून येतो. बाबा भांड, शंकर बंडू पाटील, माधव यादव, उत्तम बंडू तुपे, प्रा. व.बा. बोधे, शेषराव मोहिते, गणेश आवटे, राजन गवस हे ग्रामीण कादंबरीच्या अलिकडच्या प्रवाहातील महत्वाची नावे होत. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, परिवर्तनवादी चळवळींनी विविध वंचित गटाचे प्रश्न आपल्या कादंब-यातून आणली.

" झेलझपाट " " हाकुमी " एका नक्षलवाद्यांचा जन्म, पांगिरा, आडाअडती, भुलवा इ. कादंब-यातून ताक[illegible]णा-या आहेत. कोरकुंचे जीवन आणि त्यांचे प्रश्न यांचे चित्रण करणारी " झेलझपाट " ही मधुकर वाकोडे यांची कादंबरी लक्षणीय आहे. तर " माडिया-गोंड " समाजाचे चित्रण करणारी " हाकुमी " ही प्रा. सुरेश द्वादशीवार यांची कादंबरी आदिवासींची कुटुंबव्यवस्था स्पष्ट करतात.

सारांश :
--------

इंग्रजी सत्ता स्थिर झाल्यानंतर त्यांच्या शिक्षणविषयक नव्या धोरणाने महाराष्ट्रात ज्या समाजसुधारणाविषयक नव्या प्रवृत्ती जन्मास आल्या. अशा कालखंडात मराठी कादंबरी आणि ग्रामीण कादंबरीचा उदय झाला " यमुनापर्यटन " ही बाबा पद्मनजी यांची मराठीतील पहिली कादंबरी १८५७ साली लिहिली गेली तर ग्रामीण साहित्यातील पहिली ग्रामीण कादंबरी कृष्णराव भालेकर यांची " बळीबा पाटील " १८८७ साली लिहिली गेली या कादंबरीत दुष्काळ-ग्रस्त शेतक-यांच्या दुःखाचे चित्रण केलेले आहे.

रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची " पिराजी पाटील " ही १९०३ साली प्रकाशित झाली. या कादंबरीत ग्रामीण माणसांकडे शहरातील माणसाची पाहण्याची दृष्टी, पण शेतकरी म्हणजे अन्न देणारा महत्वाचा घटक असूनही अन्नदात्याची होणारी उपेक्षा कादंबरीकाराला अस्वस्थ करते त्याचे वास्तव चित्रण या कादंबरीतून रेखाटले आहे.

दोन्ही कादंब-यांचा विचार करता म. फुले यांच्या " शेतक-याचा असूड " या ग्रंथाचा प्रभाव दिसतो. म. फुले यांच्या विचाराची प्रेरणा जाणवते. " बळीबा पाटील " व " पिराजी पाटील " या कादंब-या म्हणजे ग्रामीण कादंबरीचा प्रथम कालखंड होय.

१९२० नंतर ग्रामीण कादंबरीने प्रादेशिक रूप धारण केलेले दिसते. तसेच गांधीवाद, मार्क्सवादी विचारांनी या कालखंडात आपल्या विचाराची बीजे रूजविली असल्यामुळे त्यांच्या विचारांचा परिणामही ग्रामीण कादंबरीवर झालेला दिसतो.

सामान्यत: १९२० ते १९४५ या कालखंडात ज्या ग्रामीण कादंबरी लेखन झाले त्यात ग. त्र्यं. माडखोलकर यांची " चंदनवाडी " ( १९४३) वि. द. घाटे(?) यांची " महापूर " ( १९४३), ग.ल. ठोकळ यांची " गावगुंड " ( १९४६ ) या कादंबऱ्या महत्वाच्या आहेत.

ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या " चंदनवाडी " या कादंबरीत साम्यवादी विचार महत्वाचा आहे. गिरणी मालक-गिरणी कामगार, जमीनदार व शेतमजूर यांच्यातील संघर्ष साम्यवादी विचारांचे समर्थन केले आहे.

र. वा. दिघे यांनी " पाणकळा(?) " या कादंबरीत रानमळे गावचा जीवनपट मांडला असून या गावातील सुष्ट, दुष्ट अशा अनेक प्रवृत्ती अपप्रवृत्तींचा निर्देश केला. या कादंबरीतील निसर्गवर्णन मात्र मनमोहक आहे. तसे शेतक-यांच्या जीवनातील दुःख यथार्थपणे दिघे यांनी उभे केले आहे.

वि. द. घाटे(?) यांनी " महापूर " या कादंबरीत ग्रामीण वास्तवाचे समग्र चित्रण या कादंबरीतून केले आहे. ग्रामीण माणसाचे दारिद्र्य, त्याचे होणारे शोषण, ग्रामीण माणसाची होणारी अवहेलना(?) व फसवणूक या बरोबरच ग्रामीण पातळीवरील जातियतेची समस्याही वास्तवाचे भान राखून चित्रित केली आहे.

ग. ल. ठोकळ यांच्या " गावगुंड " ह्या कादंबरीला १९२० ते १९४५ या कालखंडात वेगळे स्थान आहे. १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनावर ती

कादंबरी आधारीत असून सातारा जिल्हयाची पार्श्वभूमी घेऊन गावगुंड गुणाजी आणि स्वातंत्र्य आंदोलन चळवळीचे चित्रण लेखक यांनी कादंबरीतून केले आहे

१९४५-५० हया कालखंडात प्रादेशिक जीवन चित्रीत करणा-या कादंब-या प्रामुख्याने श्री. ना. पेंडसे, आणि गो. नि. दांडेकर यांनी लिहिल्या. श्री. ना. पेंडसे यांच्या " एल्गार " " हद्दपार " ( १९५०) " गारंबीचा बापू " ( १९५१ ) या कादंब-यातून प्रादेशिक जीवनाचे चित्रण आले आहे.

गो. नी. दांडेकर यांच्या " पडघवली " ( १९५५), " पवनाकाठचा धोंडी " ( १९५५) " माचीवरला बुधा" ( १९५८ ) या कादंब-यातून कोकणची प्रादेशिक वैशिष्ट्ये साकार झाली आहेत. प्रादेशिक कादंब-यानी १९४५-१९५० हा कालखंड व्यापला असून निव्वळ असे ग्रामीण जीवन चित्रित करणारी कादंबरी पाच पर्यंत दिसत नाही.

ग्रामीण कादंबरी प्रामुख्याने १९६० नंतर भरभराटीस आली असली तरी त्या अगोदरच्या दोन कादंब-या ग्रामीण वास्तवाचे चित्रण करण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाच्या आहेत. विभावरी शिरुरकर यांची " बळी " ( १९५०), व्यंकटेश माडगूळकर यांची " बनगरवाडी " ( १९५५) कादंब-या होत.

विभावरी शिरूरकर यांची " बळी " ही कादंबरी गुन्हेगार जमातीचे दुःख मांडणारी कादंबरी आहे. गुन्हेगारीचा शिक्का मारलेल्या मांग-गारुडी या लोकांचा संपूर्ण जीवनपट या कादंबरीतून मांडला आहे. या लोकांचा गुन्हेगारी व्यवसाय, भांडण, तंटे, शिव्या, दारिद्र्य, मलिन झोपडपट्टीतील राहणीमान असा समाजातील उपेक्षित स्तर आणि त्यांचे उपेक्षित जीवन विभावरी शिरूरकर यांना

वास्तव स्वरूपात या कादंबरीत मांडला.

व्यंकटेश माडगूळकर यांची " बनगरवाडी " ही १९५५ साली प्रकाशित झालेली कादंबरी, ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहातील महत्वाची कादंबरी होय. या कादंबरीतून माडगूळकरांनी ग्रामीण परिसरातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनातील अनेक पैलूवर प्रकाश टाकला आहे. सामान्यतः स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेड्यात जे बदल झाले त्यावर ही कादंबरी भाष्य करते.

१९६० नंतर ग्रामीण कादंबरी ख-या अर्थाने बहरास आली असली तरी साठनंतर जो ग्रामीण परिसरात नवशिक्षितांचा वर्ग तयार झाला त्यात विविध स्तरातील लेखकांनी आपले ग्रामीण परिसरातील प्रत्यक्ष अनुभव कादंबरी बध्द केल्याने त्या अनुभवात अधिक जिवंतपणा आला. या कादंब-यातून प्रामुख्याने खेड्यातील पारंपारिक व्यावसायिक, कष्टकरी, भटके आणि दलित यांचे दुःख चित्रणावर भर दिलेला असल्याने संपूर्ण ग्रामीण संवेदना शब्दांकित करण्यात साठनंतरची कादंबरी यशस्वी झालेली दिसते. उध्दव शेळके, " धग ", " शंकर पाटील यांची "टारफुला" रणजित देसाई यांची " माझा गाव " हमीद दलवाई यांची "इंधन " ना. धों. महानोर यांची " गांधारी " रा. रं. बोराडे यांची " पाचोळा", आनंद यादव यांची " गोतावळा" या कादंब-यांचा निर्देश करावा लागतो.

उध्दव शेळके यांनी " धग " या कादंबरीत खेड्यातील पारंपारिक असा शिंप्यांचा व्यवसाय करणा-या कुटुंबाची करुण कहाणी आहे. कादंबरीत छोटे छोटे प्रसंग गुंफलेले आहेत त्यातून अस्सल असे ग्रामीण वास्तव साकार होते. कुटुंबाचे भरण-पोषण करणा-या महादेवला महारोग होतो, तर कौतिक वेडी होते त्यामुळे या कुटुंबाची संपूर्ण वाताहत होते. बंदिस्त असे कथानक या कादंबरीला नाही प्रादेशिक वैशिष्ट्याच्या दृष्टीने ही कादंबरी महत्वाची ठरते.

13670

शंकर पाटील यांच्या " टारफुला " कादंबरीत गावातील गुंडगिरीने पोखरलेले गांव मांडले आहे. पिकात वाढलेला टारफुला अथवा काटवन पिकाला जसे मारक असते तसे काटवनाप्रमाणे वाढलेली गावातील गुंडगिरी संपूर्ण गावचं उध्वस्त करते याचे चित्रण करतात.

हमीद दलवाई यांनी " इंधन " या कादंबरीत खोतीची पध्दत गेल्याने मस्तीत वागणारे मुसलमान, कुणाचीही पर्वा न करणारे कुणबी तर अंहकाराने वागणारे बौध्द अशा तीन शक्तीतील अंतर्गत कलह दलवाईंनी मध्यवर्ती कल्पिला आहे.

साधारणत: साठच्या पहिल्या दशकातील " धग " " टारफुला " " इंधन " या कादंब-यांनी ग्रामीण कादंबरीला समृध्दी प्राप्त करुन दिली. तसेच सत्तरनंतरच्या दशकात गाजलेल्या कादंब-या रा. रं. बोराडे यांची " पाचोळा" ( १९७१ ) आनंद यादव यांची " गोतावळा" ( १९७१) ना. धों. महानोर यांची " गांधारी " ( १९७३ ).

" पाचोळा" या कादंबरीत रा. रं. बोराडे यांनी शहरीकरणामुळे उजाड होत चाललेली पारंपरिक व्यवसाय आणि त्यावर उपजिविका करणा-या कुटूंबाची होत असलेली वाताहत केंद्रवर्ती धरलेली आहे.

आनंद यादवांनी " गोतावळा" या कादंबरीत यंत्र संस्कृतीमुळे उध्वस्त होत असलेली ग्रामीण संस्कृती ह्या कथाबीजावर आधारित आहे. " गोतावळा"तील नारबा ग्रामीण संस्कृतीचे एक प्रतिकात्मक रुप म्हणून त्याचा जीवनपट यादवांनी मांडला.

ना. धों. महानोर यांची " गांधारी " ही कादंबरी एका खेड्याचा संपूर्ण जीवनपट मांडण्यासाठी लिहिली आहे. या कादंबरीत रजाकाराने जो हाहा:कार करुन " गांधारी" गाव उध्वस्त केले आणि नंतर स्थिर झालेल्या या गावाला राजकारणामुळे जी अस्थिरता आली त्यांचे कादंबरीत केले.

ग्रामीण कादंबरीला नवी दिशा देण्याचे काम केले त्यात महादेव मोरे, विश्वास पाटील, नावे महत्वाची आहेत. महादेव मोरे यांचे अनुभव विश्व वेगळे आहे. डोंबरी गंग, गारुडी, ट्रक चालक, शेतावर काम करणारे कुळगडी वेश्या विडी कामगार अशा जीवन विश्वातून कादंबरी वाङ्मय साकारले. विश्वास पाटील यांनी " आडाझडतीतून" ग्रामीण जीवनाचा प्रत्यय घडवितात. चंद्रकुमार नलगे रोमँटिक प्रवृत्ती जपताना दिसतात.

बाबा भांड, शंकर खंडू पाटील, व.बा. बोधे, गणेश आपटे, वासुदेव मुळाटे, सदानंद देशमुख, हे काही ग्रामीण कादंबरीच्या अलिकडच्या प्रवाहातील महत्वाची नावे होत. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिवर्तनादी चळवळींनी विविध वंचित गटाचे प्रश्न यांच्या साहित्यातून आल्याचे दिसतात.

प्रकरण पहिले

संदर्भ


[१] अ. आनंद यादव : "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या" पुणे, मेहता पब्लिशिंग हाउस, जुलै १९९३, आ. दु. पृ.

ब. गो. मा. पवार :

क. आनंद यादव : "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या" पुणे, मेहता पब्लिशिंग हाउस, जुलै १९९३, आ. दु. पृ. ६२/६३

[२] तत्रैव : पृ. ६६/६७

[३] अंबादास माडगूळकर आणि : "मराठी ग्रामीण कथा" लेखन वाचन भांडार, पुणे आ. प. पृ. ४४/४५

[४] ना. सी. फडके : "प्रतिभा विलास" विश्वकर्मा साहित्यालय, आ. प. १९६६ पृ. १९९

[५] तत्रैव : पृ. १९९

[६] महाराष्ट्र साहित्य पत्रिका : ग्रामीण साहित्य विशेषांक, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे जुलै/डिसेंबर १९८०, पृ. ४५

[७] ना. सी. फडके : "प्रतिभा विलास" विश्वकर्मा साहित्यालय पृ. १९९

[८] नागनाथ कोतापल्ले : "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध" मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, आ. प. १९८५ पृ. १५

[९] महाराष्ट्र साहित्य पत्रिका : ग्रामीण साहित्य विशेषांक, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे जुलै/डिसेंबर, १९८०, पृ. ४५-५०

[१०] लक्ष्मणशास्त्री जोशी : महाराष्ट्र विश्वकोश खंड, १० महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, आ. प. १९८१, पृ. ९७०.

[११] रविंद्र ठाकूर : "मराठी ग्रामीण कादंबरी" मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे आ. प. १९९३, पृ ३०-३१

[१२] रविंद्र ठाकूर : "मराठी ग्रामीण कादंबरी" मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे आ. प. १९९३, पृ. ३३

[१३] आनंद यादव : "ग्रामीणता" साहित्य आणि वास्तव" मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, आ. प. १०८१, पृ. १२१

[१४] रविंद्र ठाकूर : "मराठी ग्रामीण कादंबदी" मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे आ. प. १९९३ पृ. ४०

[१५] कुसुमावती देशपांडे : "मराठी कादंबरी: पहिले शतक" मराठी साहित्य संघ, मुंबई. आ. प. १९७५, पृ. ३१२

[१६] रविंद्र ठाकूर : "मराठी ग्रामीण कादंबरी"
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
आ. प. १९९३, पृ. ४४

[१७] पु. वा. बापट, ना. वा. गोडबोले: "मराठी कादंबरी : तंत्र आणि
विकास" व्हिनस प्रकाशन, आ. ति.
१९७३, पृ. ३६४.

[१८] कुसुमावती देशपांडे : "मराठी कादंबरी : पहिले शतक
मराठी साहित्य संघ, मुंबई, आ. दु.
१९७५, पृ. ३३

[१९] उषा हस्तक : "कादंबरी आणि मराठी कादंबरी"
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद
आ. प. १९९३ पृ. २६२.

[२०] रवींद्र ठाकूर : "मराठी ग्रामीण कादंबरी"
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
आ. प. १९९३, पृ. ९६.